सोलापूर

# तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, १२ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक २८९ | पाने : ८+ आसमंत पुरवणी | किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## 'एचएएल'ने थांबवली ध्रुव हेलिकॉप्टरची उड्डाणे

### पोरबंदर येथील अपघातानंतर घेतला निर्णय

नवी दिल्ली, ११ जानेवारी : गुजरातच्या पोरबंदर विमानतळावर ५ जानेवारी रोजी भारतीय तटरक्षक दलाचे ध्रुव-एमके हेलिकॉप्टर कोसळून ३ जणांचा मृत्यू झाला होता. दुहेरी इंजिन असलेल्या या हेलिकॉप्टरच्या अपघाताचे कारण अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. त्यामुळे हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडने (एचएएल) स्वदेशी बनावटीच्या या हेलिकॉप्टरची उड्डाणे थांबवण्याचा निर्णय घेतला आहे.

यासंदर्भात एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार तटरक्षक दलाच्या अपघातग्रस्त हेलिकॉप्टरच्या एफडीआर (फ्लाइट डेटा रेकॉर्डर) आणि सीव्हीआर (कॉकपीट व्हॉइस रेकॉर्डर) डेटाच्या प्राथमिक विश्लेषणातून असे दिसून आले आहे की ते क्रॅश होण्यापूर्वी पायलटांनी हेलिकॉप्टरवरील नियंत्रण गमावले होते. यापूर्वी जून २०२१ मध्ये एचएएलकडून दाखल झालेल्या एएलएच मार्क-३ हेलिकॉप्टरने ९० मिनिटांचे सराव उड्डाण पूर्ण केले होते. तसेच ५.५ टन वजनाच्या या हेलिकॉप्टरने २०० फूट उंचीवर घिरट्या घालत असताना पायलटांच्या नियंत्रण सूचनांना प्रतिसाद दिला नाही. परिणामी ते नंतर जमिनीवर कोसळले आणि त्याला आग लागली. या दुर्घटनेत कमांडंट सौरभ आणि डेप्युटी कमांडंट एस के यादव हे दोन्ही पायलट आणि एअर क्रू डायव्हर मनोज प्रधान नाविक यांचा मृत्यू झाला होता. गेल्या वर्षी सप्टेंबरमधील आणखी एका घटनेत पोरबंदरहून निघालेले ध्रुव हेलिकॉप्टर अरबी समुद्रात कोसळले होते. यात तटरक्षक दलाचे २ पायलट आणि एका एअरक्रू डायव्हरचा मृत्यू झाला होता. त्याचप्रमाणे ५ जानेवारी २०२५ रोजी झालेल्या दुर्घटनेनंतर सुरक्षा तपासणीसाठी सशस्त्र दलांनी त्यांच्याकडील सर्व ३३० एएलएच हेलिकॉप्टची उड्डाणे तात्पुरती थांबवली आहेत.

## शालेय जीवनातच मिळावे वाहतूक नियमांचे धडे- नितीन गडकरी

### सुप्रसिद्ध अभिनेते अनुपम खेर यांनी घेतली मुलाखत



नागपूर, ११ जानेवारी : वाहतुकीचे नियम तोडणाऱ्यांना दंड ठोठावला. कायदे कडक केले; तरीही रस्ते अपघातातील मृत्यू थांबलेले नाहीत. मानसिकता बदलत नाही, तोपर्यंत आपण यावर नियंत्रण मिळवू शकत नाही. शालेय जीवनातच वाहतुकीच्या नियमांचे धडे मिळणे आवश्यक आहे. शालेय शिक्षण घेण्याच्या वयात मुलांवर चांगल्या गोष्टींचा प्रभाव पडला तर तो कायमस्वरुपी राहतो, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

सडक सुरक्षा अभियानांतर्गत नागपूरच्या वनामती येथे आयोजित कार्यक्रमात सुप्रसिद्ध अभिनेते अनुपम खेर यांनी गडकरींची प्रकट मुलाखत घेतली. सुरुवातीलाच गडकरी यांनी देशभर महामार्गांचे जाळे विणण्याचे मोठे काम केल्याचा उल्लेख अनुपम खेर यांनी केला. अपघातांमध्ये मृत्यू होणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे, असे गडकरी म्हणाले. 'कोरोनामध्ये, युद्धामध्ये किंवा एखाद्या दंग्यामध्ये जेवढ्या लोकांचा मृत्यू झाला नसेल तेवढे मृत्यू दरवर्षी रस्ते अपघातामध्ये होतात. याची मला खंत वाटते. रस्ते अपघात रोखायचे असतील तर अचूक निर्माणकार्य आणि समाजजागृती दोन्हींची आवश्यकता आहे. जनजागृतीचे कार्य शालेय स्तरापासूनच व्हायला हवे असे गडकरी यांनी सांगितले.

या देशात आणखी उत्तम रस्ते तयार होतील. पण लोकांना शिस्त नसेल तर या रस्त्यांचा काहीही उपयोग नाही. सिग्नल तोडणे, लेन तोडून निघून जाणे, मर्यादेपेक्षा जास्त वेगाने गाडी चालणे, हेल्मेट न लावणे, सिटबेल्ट न बांधणे अशा कितीतरी चुका लोक करतात. आपली आई, पत्नी, मुले घरी वाट बघत असतील, हे ध्यानात ठेवून गाडी चालवावी. कारण वर्षभरात होणाऱ्या अपघतांमध्ये जे मृत्यू होतात, त्यात १८ ते ३४ वर्ष वयोगटातील तरुणांची संख्या जास्त आहे. एखाद्या घरातील तरुण अचानक निघून जातो, तेव्हा त्या कुटुंबावर कोसळणाऱ्या संकटाची आपण कल्पनाही करू शकत नसल्याचे गडकरींनी यावेळी सांगितले.

## पंतप्रधानांकडून श्रीराम मंदिर वर्धापन दिनाच्या शुभेच्छा

नवी दिल्ली, ११ जानेवारी : अयोध्येत श्रीरामांच्या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेच्या वर्धापनदिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. यासंदर्भात मोदींनी ट्विटरवर (एक्स) एक व्हिडीओ देखील शेअर केला आहे. आपल्या संदेशात त्यांनी सांगितले की, अयोध्येत प्रभू श्रीरामांच्या मूर्तीच्या प्राण प्रतिष्ठेच्या पहिल्या वर्धापनदिनानिमित्त सर्व देशवासियांना खूप खूप शुभेच्छा. अनेक शतकांचे समर्पण, तपस्या आणि संघर्षानंतर स्थापन करण्यात आलेले हे मंदिर आपली समृद्ध संस्कृती आणि अध्यात्मिक वारसा आहे.






## केंद्रीय मंत्री रिजिजू सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर

### हज यात्रेसंदर्भात द्विपक्षीय करारावर करणार स्वाक्षरी

नवी दिल्ली, ११ जानेवारी : केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू आज, शनिवारपासून सौदी अरेबियाच्या ५ दिवसीय दौऱ्यावर आहेत. हज यात्रेसाठी द्विपक्षीय करारावर स्वाक्षरी करणे हा या दौऱ्याचा मुख्य हेतू असून भारताने १० हजार अतिरिक्त हज यात्रेकरूंसाठी कोटा वाढवण्याची मागणी केली आहे.रिजिजू उद्या सौदी अरेबियाचे मंत्री तौफिक बिन फौजान अल रबिया यांची भेट घेतील, जिथे दोन्ही नेते हज करारावर स्वाक्षरी करू शकतात.

यासंदर्भात केलेल्या ट्विटमध्ये (एक्स) किरेन रिजिजू म्हणाले की, सौदी अरेबियाला भेट देण्यास उत्सुक आहे. जिथे आपण २०२५ साठी द्विपक्षीय करारांवर स्वाक्षरी करू आणि दोन्ही देशांमधील लोकांमधील संबंध मजबूत करू असे त्यांनी सांगितले. यासोबतच रिजिजू सौदी अरेबियाचे वाहतूक आणि लॉजिस्टिक्स सेवा मंत्री सालेह अल जस्सेर यांचीही भेट घेतील. बैठकीत हवाई उड्डाणे, बस आणि रेल्वे सेवांच्या संचालनावर चर्चा केली जाईल. रिजिजू भारतीय यात्रेकरू वापरतात अशा जेद्दाह हज टर्मिनललाही भेट देतील. भारत सरकारने यात्रेकरूंना सुविधा देण्यासाठी तेथे एक विशेष कार्यालय स्थापन केले आहे.सौदी अरेबियाने २०२५ साठी भारताचा हज कोटा १ लाख ७५ हजार २५ इतका निश्चित केला आहे, तर भारत सरकार अतिरिक्त १० हजार यात्रेकरूंचा कोटा वाढवण्याची विनंती करत आहे. यावेळी रिजिजू मदिनालाही भेट देतील, जिथे ते कुबा आणि कुब्लातैन मशिदींना भेट देतील. या काळात ते सौदी राजघराण्यातील सदस्यांनाही भेटतील, ज्यात राजा मोहम्मद बिन सलमान यांचे सल्लागार प्रिन्स खालिद अल फैसल आणि मक्का प्रदेशाचे गव्हर्नर प्रिन्स सलमान बिन सुलतान यांचा समावेश आहे. हज यात्रेसाठी, ७० टक्के कोटा हज समितीला दिला जाईल, तर ३० टक्के कोटा खाजगी हज गट आयोजकांना दिला जाईल.

## बांधकाम सुरु असलेली लिंटल कोसळली; अनेक कामगार अडकले, मदतकार्य सुरु

कन्नौज : उत्तर प्रदेशातील कन्नौज रेल्वे स्थानकावर सुशोभीकरणाच्या कामादरम्यान एक गंभीर दुर्घटना घडली. स्टेशनच्या दुसऱ्या मजल्यावरील बांधकाम सुरू असलेला लिंटेल अचानक कोसळल्याने मोठा गोंधळ उडाला. अपघाताच्या वेळी २४-२५ कामगार बांधकामात व्यस्त होते. त्यापैकी आतापर्यंत १८ जणांना ढिगाऱ्याखालून बाहेर काढण्यात आले आहे. प्रशासनाने जेसीबीच्या साहाय्याने इतर गाडलेल्या लोकांचा शोध घेण्याचे काम सुरू ठेवले आहे. या दुर्घटनेत अनेक कामगार ढिगाऱ्याखाली अडकले असल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. स्थानिक प्रशासन, रेल्वे अधिकाऱ्यांसह एसडीआरएफच्या पथकाने घटनास्थळी पोहोचून मदतकार्य गतीने सुरू केले आहे. जखमींना तातडीने रुग्णालयात पाठवले जात आहे.

## मुंबई, गुजरातसह आता आसाममध्येही एचएमपीव्ही व्हायरसची एन्ट्री!

दिसपूर : देशात ह्युमन मेटान्यूमोव्हायरस प्रकरणात वाढ होत आहे. असाच काहीसा प्रकार आसाममध्येही घडताना दिसत आहे. लखीमपूरमध्ये, एका १० महिन्यांच्या मुलाला एचएमपीव्ही व्हायरसची लागण झाली आहे. सध्या मुलाला दिब्रुगडमधील आसाम मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलं आहे. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, मुलाची प्रकृती स्थिर आहे आणि काळजी करण्यासारखं काहीही कारण नाही.

आसाममधील या प्रकरणासह, देशात एचएमपीव्ही प्रकरणांची एकूण संख्या १५ वर पोहोचली आहे. गुजरातमध्ये सर्वाधिक ४ प्रकरणे आहेत. यापूर्वी गुरुवारी ३ प्रकरणे नोंदवली गेली होती. रुग्णांची संख्या सातत्याने वाढत असल्याने लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**सतत हात स्वच्छ धुवा, मास्क घाला**

तसेच रुग्णसंख्येची वाढ लक्षात घेत सिक्कीम सरकारने परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी एक सूचना जारी केली आहे. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, मुख्य सचिवांनी अलीकडेच आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागासोबत सध्याच्या धोक्याचे मूल्यांकन करण्यासाठी आणि राज्याच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी बैठक घेतली. या बैठकीत आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभाग सतत परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. साबणाने सतत हात स्वच्छ धुवा, मास्क घाला असा सल्ला देण्यात येत आहे.

## टिकू तलसानिया रुग्णालयात, ब्रेन स्ट्रोकमुळे तब्येत ढासळली

मुंबई : प्रसिद्ध अभिनेता टिकू तलसानिया (७०) रुग्णालयात आहे. ब्रेन स्ट्रोकमुळे त्याची तब्येत ढासळली आहे. टिकूची पत्नी दीप्ती तलसानियाने ही माहिती दिली. एका चित्रपटाच्या स्क्रीनिंगसाठी गेला असताना रात्री आठच्या सुमारास टिकू तलसानियाची तब्येत बिघडली. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या टिकू तलसानियावर उपचार सुरू आहेत, अद्याप संकट टळलेले नाही.

रात्री टिकू तलसानिया एका चित्रपटाच्या स्क्रीनिंगला गेला होता. या कार्यक्रमाचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. या व्हिडीओत रश्मी देसाई टिकू तलसानियाच्या पायांना स्पर्श करुन आशीर्वाद घेताना दिसत आहे. टिकू तलसानियाने विनोदी अभिनेता म्हणून अनेक चित्रपट आणि टीव्ही मालिकांतून काम केले आहे. त्याने सलमान खान, शाहरुख खान आणि आमिर खानसोबत काम केले आहे. 'कुली नंबर १' (१९९५), 'राजा हिंदुस्तानी' (१९९६), 'जुडवा' (१९९७) आणि 'हम हैं राही प्यार के' (१९९३), 'अंदाज अपना अपना' (१९९४), 'बडे मियाँ छोटे मियाँ' (१९९८), 'राजू चाचा' (२०००), 'हंगामा' (२००३), 'धमाल' (२००७) 'देवदास' (२००२) या चित्रपटांमध्ये टिकू तलसानियाने अभिनय केला आहे.






## छापा टाकायला गेलेल्या आयकर विभागाला पैसे नाही तर सापडल्या मगरी

मध्य प्रदेश : मध्यप्रदेशातील एका घरात छापा टाकायला गेलेल्या आयकर विभागातील अधिकाऱ्यांना मगरी सापडल्याची खळबळजनक घटना घडली आहे. मध्यप्रदेशातील सागर जिल्ह्यात एका घरात आयकर विभागाने छापा टाकला याच दरम्यान तीन ते चार मगरी बाहेर पडल्या. या प्रकरणाची माहिती वन विभागाला देण्यात आली, त्यानंतर तातडीने मगरींना रेस्क्यू करण्यात आलं. या प्रकरणी वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मगरींची आरोग्य तपासणी केली जात आहे. या प्रकरणाची संपूर्ण माहिती न्यायालयाला दिली जाईल आणि कायद्यानुसार पुढील कारवाई केली जाईल.







# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये रविवार दि १२ जानेवारी रोजी ११ ते २ आस्थीरोग तपासणी

## मनके व सांधे बदली शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ जानेवारी**

राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व संत आदर्श ऋषीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित, बीड येथील जालना रोड, शाहु बँकेजवळ असलेले आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे रविवार १२ जानेवारी रोजी ११ ते २ या वेळेत आस्थीरोग तपासणी तसेच मनके व सांधे बदली, गुडघे दुखी, पाठ दुखी, कंबर दुखी तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. वैद्यकीय सेवा दिवसेंदिवस महाग होत असल्याने बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य रुग्णांना कमीत कमी पैशात सेवा उपलब्ध व्हावी या उदात्त हेतुने शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी अस्थिरोग असणार्या रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन सकल जैन समाज बीडच्यावतीने करण्यात आले आहे.

या शिबीरात संपूर्ण गुडघा प्रत्यारोपण, संपूर्ण खुबा प्रत्यारोपण ६५ हजार रुपये व पुढील खर्चात गुणवत्तापूर्ण इन्प्लांटसह, आर्थोस्कोपी निदान करण्यात येणार आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत पात्र रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केल्या जातील. शिबीरात आस्थिरोग सर्जन डॉ. रोहन धोत्रे व तज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी व उपचार करणार आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटल रुग्णसेवेमध्ये राज्यामध्ये सुप्रसिध्द आहे. आनंदऋषीजी रुग्णालयात १ हजार ३०० पेक्षा जास्त कर्मचारी, विविध फिल्डमध्ये २५० पेक्षा अधिक डॉक्टर सेवा करत आहेत. आज पर्यंत हजारो अस्थिरोग असणार्या रुग्णांवर उपचार करुन असंख्य रुग्ण या आजारापासून मुक्त झालेले आहेत. आस्थीरोग शिबीरात तपासणी करण्यासाठी नोंदणी फीस केवळ १०० रुपये ठेवण्यात आलेली आहे. नोंदणीसाठी मो. ८२६२००९०९१ यावर संपर्क साधावा. वेळे अभावी नोंदणी करु न शकलेल्या रुग्णांची देखील तपासणी करण्यात येणार आहे.

रविवार १२ जानेवारी रोजी ११ ते २ या वेळेत, अहमदनगर येथील तज्ञ डॉ.रोहन धोत्रे व त्यांचे सहकारी डॉक्टर रुग्णांची तपासणी करणार आहेत. संत आनंदऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने गेल्या २० वर्षापासून हॉस्पिटल कार्यरत आहे. तरी बीड शहरातील व पंचक्रोषीतील आस्त्रीरोग रुग्णांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन बीडचे विश्वस्त व समस्त जैन समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

# रोटरीच्या पुढाकारातून महारक्तदान शिबीर

## पंधरा संघटनांचा सक्रीय सहभाग; आज होणार शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ जानेवारी**

राष्ट्रीय युवा दिन, राजमाता जिजाऊ साहेब जयंती तसेच स्वामी विवेकानंद जयंतीचे औचित्य साधून रोटरी परिवार बीड व विविध सामाजिक संघटनेच्या वतीने बीडमध्ये ऐच्छिक महा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दि.१२ जानेवारी रोजी सकाळी ९ ते १ या वेळेत श्री.गुरुनानक मंदिर, श्री.स्वामी समर्थ मंदिराजवळ, सह्योग नगर येथे हे शिबीर होणार आहे.

बीड मध्ये प्रथमच सर्व सामाजिक संघटना यांनी एकत्रित येऊन या महा रक्तदान शिबिराचे आयोजन केलेले आले आहे. गत काही काळापासून जिल्हा रुग्णालयातील रक्तपेढीत पुरेसा साठा उपलब्ध नसल्याने अडचणी निर्माण होत आहेत. ही बाब लक्षात घेवून हे शिबीर आयोजीत करण्यात आले असून यामध्ये शहरातील नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन रोटरी क्लब ऑफ बीडचे अध्यक्ष - रो.मेघराज पिंगळे, रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन चे अध्यक्ष - रो.नितीन गोपन, रोटरी क्लब ऑफ बीड सिटीचे अध्यक्ष - सौ.संध्या मिश्रा, बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष - भास्करराव जाधव, कार्याध्यक्ष - अशोक शेटे, बीड डिस्ट्रिक्ट कन्सल्टिंग इंजिनीअर्स असोसिएशन चे अध्यक्ष - दिपक कुलकर्णी, माहेश्वरी प्रगती मंडळ चे अध्यक्ष - सुरेंद्र कासट, बीड शहर व्यापारी संघटनाचे अध्यक्ष - प्रकाश कानगावकर, डेंटल असोसिएशन बीडचे अध्यक्ष - डॉ.उमाशंकर विश्वेकर, बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष - ॲड. रोहिदास येवले, भारतीय जैन संघटना बीडचे अध्यक्ष - निलेश ललवाणी, क्रेडाई संघटना बीडचे अध्यक्ष - संतोष जाधव, स्वराज्य मुद्रा सामजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष - सौ अनितताई भोसले, बीड जिल्हा सीए व टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचे अध्यक्ष सीए भानुदास जाधव, पतंजली योग समिती बीडचे प्रांतप्रभारी ॲड.श्रीराम लाखे, योग प्रतिष्ठान बीड चे अध्यक्ष ॲड.प्रशांत माने यांनी केले आहे. या शिबीराच्या यशस्वीतेसाठी रो.अक्षय शेटे, रो.बालाजी घरत, रो. नितीन भोसले, रो.गणेश मैड, डॉ.अनिल थोरात हे परिश्रम घेत आहेत.

# संघर्षातूनच दिव्यत्व प्राप्त होते - ना.पंकजा मुंडे

### स्वामी विवेकानंद यांनी भारतीयांचे आत्मभान जागृत केले - प्रा.अभय भंडारी
### दीनदयाळ बँकेची युगपुरूष स्वामी विवेकानंद व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.११ जानेवारी**



दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १० जानेवारी ते १२ जानेवारी २०२५ या कालावधीत तीनही दिवस दररोज सायंकाळी ६.३० वाजता युगपुरूष स्वामी विवेकानंद यांच्या १६२ व्या जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. पहिल्या दिवशी प्रसिद्ध व्याख्याते प्रा.अभय भंडारी यांनी 'स्वामी विवेकानंद आणि भारतीय राष्ट्रवाद' या विषयावर आपले मौलिक चिंतन मांडले. व्याख्यानमालेचे उद्धाटन बँकेच्या संचालिका तथा राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरूवात भारतमाता, स्वामी विवेकानंद, पंडित दीनदयाळजी उपाध्याय यांच्या प्रतिमापूजन आणि दीपप्रज्ज्वलनाने करण्यात आली. बँकेच्या वतीने मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला. तर यावेळी बँकेचे संस्थापक प्राचार्य राजाभाऊ धाट यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचे मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर प्रमुख व्याख्याते प्रा.अभय भंडारी, भाजपाचे युवा नेते अक्षय मुंदडा, बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख, तर प्रमुख अतिथी म्हणून रोटरी क्लबचे सचिव धनराज सोळंकी, छत्रपती राजर्षी शाहू महाराज पतसंस्थेचे अध्यक्ष राजू मोरे आणि दीनदयाळ बँकेचे संचालिका सौ.शरयूताई हेबाळकर, सर्व संचालक श्री इंजि.बिपीन क्षीरसागर, मकरंद कुलकर्णी सोनेसांगवीकर, प्रा.अशोक लोमटे, प्रा.जयकरण सुरेशकांबळे, डॉ.विवेक दंडे, चैनसुख जाजू, तज्ज्ञ संचालक ॲड.अशोक कुलकर्णी, महादेव ईटके व मुख्यकार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उद्धाटक म्हणून बोलताना ना.पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, संघर्षातूनच दिव्यत्व प्राप्त होते. याची प्रचिती स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्यातून पुढे येते. आज राष्ट्र महासत्तेकडे वाटचाल करीत असतानाही त्यांचे विचार दिशादर्शक ठरत आहेत. प्रत्येक युगात एक युगपुरूष जन्माला येत असतो. त्याचे विचार हे चिरकाल जगाला मार्गदर्शक ठरत असतात. स्वामी विवेकानंद यांचे विचार युवकांना कायम प्रेरणादायी ठरणारे आहेत. असे सांगून त्यांनी दीनदयाळ बँक व्याख्यानमालेच्या माध्यमातून प्रबोधनाची चळवळ अखंडितपणे राबवित असल्याचे कौतुक ही राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.मुंडे यांनी केले. तर प्रथम पुष्प गुंफताना 'विवेकानंद- आणि भारतीय राष्ट्रवाद' हा विषय अतिशय समरसतेने गुंफताना प्रा.अभय भंडारी (विटा जि. सातारा) यांनी सांगितले की, स्वामीजींनी भारतीय स्वातंत्र्याचा आणि आर्थिक सबलीकरणाचा पुरस्कार केला. राष्ट्र हेच ईश्वर माना असा मौलिक संदेश दिला. स्वामीजींच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव संबंध जगावर पडला. ज्ञान आणि साधना हे मार्ग स्वामीजींनी दाखवले. त्यांनी आत्मबलाचे महत्त्व पदोपदी विषद केले. १२०० वर्षे गुलामगिरी अनुभवलेला भारतीय समाज मानसिकदृष्ट्या खचला होता. तेव्हा स्वामी विवेकानंद यांनी देशभर भ्रमंती करून अस्थिपंजर झालेल्या भारतीयांशी संवाद साधला. त्यांना जाणून घेतले. त्यांचे मनोबल वाढविले. अमेरिकेच्या शिकागो येथील जागतिक धर्म परिषदेत ७ हजार प्रतिनिधींसमोर हिंदू धर्म व संस्कृतीचे दर्शन घडविले. हिंदू धर्माचे चिंतन मांडले. कर्म सिध्दांत सांगितला. चारित्र्य, राष्ट्रप्रेम यांचा पुरस्कार केला. युवकांनी सत्य आणि निर्भयता आत्मसात करावी असा विचार मांडला. आत्म्याची शुध्दता, पावित्र्य, सकारात्मक विचार, सत्याचा आग्रह धरला. विविध उदाहरणे देत प्रा.भंडारी यांनी तत्कालीन भारतीय जनतेचे आत्मभान जागृत करण्याचे काम स्वामी विवेकानंद यांनी केले असे प्रतिपादन केले. प्रा.भंडारी यांनी तपशीलवार, मुद्देसूद, प्रवाही व अभ्यासपूर्ण चिंतन मांडले. त्यामुळे उपस्थित रसिक - श्रोत्यांना प्रा.भंडारी यांचे व्याख्यान मनापासून भावले, आवडले. म्हणून रसिक - श्रोत्यांनी ही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सुरूवातीला कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांनी केले. तर पाहुण्यांचा परिचय संचालक इंजि.बिपिन क्षीरसागर यांनी करून दिला. सुत्रसंचलन संचालक मकरंद कुलकर्णी सोनेसांगवीकर यांनी केले. तर उपस्थितांचे आभार तज्ज्ञ संचालक ॲड.अशोकराव कुलकर्णी यांनी मानले. वैशालीताई विडेकर यांनी पद्य सादर केले. तर संचालिका शरयूताई हेबाळकर यांनी पठन केलेल्या शांती मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी अंबाजोगाईतील विविध क्षेत्रातील मान्यवर, महिला भगिनी, ज्येष्ठ नागरिक, युवक, रसिक श्रोते उपस्थित होते. आयोजित व्याख्यानमालेत शनिवार, दि.११ जानेवारी रोजी प्रकाश पाठक (धुळे) यांचे 'पंचप्रण' - सामाजिक परिवर्तनाची गुरूकिल्ली या विषयावर व्याख्यान होईल. बँकेच्या वतीने दि.११ जानेवारी रोजी सहकार भारती स्थापना दिवस ही साजरा करण्यात येईल. या प्रबोधनपर व्याख्यानमालेचा समारोप रविवार, दि.१२ जानेवारी रोजी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भिकुजी दादा इदाते (दापोली) यांच्या 'सामाजिक आचारसंहितेची गाथा - संविधान' या विषयावरील व्याख्यानाने होईल. तसेच १२ जानेवारी रोजी युगपुरूष स्वामी विवेकानंद यांची जयंती बँकेच्या वतीने साजरी होईल. अंबाजोगाई शहर व परिसरातील रसिक, श्रोते, नागरिक, माता, भगिनी आणि युवक वर्गाने सहकुटूंब सहपरिवार उपस्थित राहून युगपुरूष स्वामी विवेकानंद व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा असे आवाहन दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# चिमुर येथे होणार्या शिक्षकेत्तर महामंडळाच्या ५२ व्या राज्यस्तरीय अधिवेशनास कर्मचाऱ्यांनी उपस्थित रहावे- जिल्हाध्यक्ष संजय डावकर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ जानेवारी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेत्तर महामंडळाचे ५२ वे राज्यस्तरीय अधिवेशन चंद्रपुर जिल्ह्यातील चिमुर येथे १९ जानेवारी रोजी होत आहे. या अधिवेशनास जिल्ह्यातील जास्तीत जास्त शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन संघटनेचे जिल्हाध्यक्ष संजय डावकर यांनी केले आहे.

शिक्षकेत्तर महामंडळाच्या अधिवेशनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे उपस्थित राहणार आहेत. या अधिवेशनासाठी संपूर्ण राज्यातून हजारो शिक्षकेत्तर बंधु-भगिनी उपस्थित राहणार असल्याची माहिती शिक्षकेत्तर महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजीराव खांडेकर यांनी दिली असुन



माध्यमिक शाळेतील शिक्षकेत्तर कर्मचार्यांचे अनेक प्रलंबित प्रश्न महामंडळाच्या माध्यमातून या पुर्वी सोडवण्यात आले असुन उर्वरित प्रलंबित प्रश्न देखील लवकरात लवकर महामंडळाच्या माध्यमातून सोडवण्यात येतील. या अधिवेशनास जिल्ह्यातील जास्तीत जास्त शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन बीड जिल्हा शिक्षकेत्तर संघटनेचे जिल्हाउपाध्यक्ष शेख मोहसीन, नंदकुमार शिंदे, सचिव नामदेव वाघ, सहसचिव दत्तात्रय आगवान, कार्याध्यक्ष अविनाश कळंबकर, कोषाध्यक्ष सतिष महाजन आदिंच्या वतीने करण्यात आले आहे.

# स्थानिक गुन्हे शाखा-बीड उल्लेखणीय कामगिरी

## पुणे येथील कोयता गँग मधील कुख्यात फरार असलेला मुख्य आरोपी गोरख सातपुते जेरबंद




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ जानेवारी**

नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक,बीड यांनी अवैध धंदे व शस्त्र बाळगणाऱ्या विरुध्द कडक कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री. उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांनी अवैध धंदे व शस्त्र बाळगणारे इसमांची गोपनिय माहिती काढुन कारवाई करण्यासाठी अधिनस्त अधिकारी यांना सुचना दिल्या आहेत. त्यावरुन दिनांक १०/०१/२०२५ रोजी स्थागुशा येथील पोउपनि सिध्देश्वर मुरकुटे हे त्यांचे पथकासह गेवराई उपविभागात पेट्रालिंग करीत असतांना पोना/ विकास वाघमारे यांना गुप्त बातमी मिळाली की, म्हाडा कॉलनी जवळ रस्यार*वर एका रिक्षामध्ये दोन इसमांकडे तलवार व कोयता आहे अशी खात्री लायक बातमी मिळताच सदर माहिती पो.नि.श्री. उस्मान शेख यांना कळवुन त्यांनी कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश पथकाला दिले त्यावरुन स्थागुशा पथक तात्काळ बातमी ठिकाणी रवाना होवुन सदर इसमाचा शोध घेण्यात सुरवात केली असता म्हाडा कॉलनी जवळ रस्यार*वर सापळा लावला सदर इसम हे पथकाला बघुन टोरिक्षामधुन पळुन जाण्याचे बेतात असतांना त्यांचेवर झडप घालुन स्था.गु.शा. अधिकारी व अंमलदार यांनी पकडले. त्यांची नावे १) गोरख प्रमुख सातपुते वय २९ वर्ष रा. काळेवाडी फाटो, थेरगाव ,जि.पुणे, २) तात्याराव उर्फ वैभव विजय पहाडे वय २८ वर्षे रा. रहाटी फाटा, अमरदिप कॉलनी, पुणे असे सांगितले . त्यांचे ताब्यातुन एक लोखंडी कोयता , एक लोखंडी तलवार, एक लोखंडी चाकु व गुन्हयात वापरलेली रिक्षा असा एकुण १,०४,०००/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन सफौ/तुळशिराम जगताप यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्याद वरुन नमुद दोन्ही आरोपीतां विरुध्द पो.स्टे.गेवराई येथे भारतीय शस्त्र अधिनियम कलम ४,२५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वरील दोन्ही आरोपी हे पुणे येथील कोयता गँगचे सदस्य असुन कुख्यात असुन पो.स्टे.काळेवाडी (पिंपरीचिंचवड) गुरनं १०/२०२५

हाफ मर्डर च्या गुन्हयामध्ये फरार आरोपी आहेत. दोन्ही आरोपीतांना स्था.गु.शा.पथकाने पो.स्टे.गेवराई यांचे ताब्यात देण्यात आलेले असुन पुढील तपास पो.स्टे.गेवराई करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.श्री. नवनीत काँवत पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, पोनि श्री. उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि सिध्देश्वर मुरकुटे, सफौ / तुळशिराम जगताप, पोह/कैलास ठोंबरे, मनोज वाघ, विष्णु सानप, राहुल शिंदे, पोना/ विकास वाघमारे व चालक सुनिल राठोड यांनी मिळुन केली आहे.

# शासकीय रेखाकला परीक्षा (इंटरमेजिएट,चित्रकला) २०२४ च्या परीक्षेत खोलेश्वर माध्यमिक विद्यालयातील चैत्राली करपुडेचे राज्यस्तरावर यश

## खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाचा १००% निकालाची परंपरा कायम

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.११ जानेवारी**

येथील खोलेश्वर माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दरवर्षी प्रमाणे याही वर्षी महाराष्ट्र शासनाच्या तंत्रशिक्षण विभागामार्फत कला संचालनालय मुंबई तर्फे घेण्यात येणा-या शासकीय ग्रेड परीक्षा (चित्रकला) २०२४ चा परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून यात चैत्राली करपुडे इ.९वी या विद्यार्थिनीने महाराष्ट्रात पन्नासावा क्रमांक पटकावला आहे.जिल्हा परिषद केंद्र १३१००२ या केंद्रावर ७६ विद्यार्थी या परीक्षेस प्रविष्ट झाले होते.त्यापैकी - ग्रेड मध्ये २६,आदित्य कावळे,अमृता हेडे,अनिकेत गित्ते,अंजली पांचाळ,अनुष्का बिंरगे,अरूधंती देशपांडे, धनश्री बडे,गार्गी चाटे,गौरव जैन,जयश्री केंद्रे,कौस्तुभ मातेकर,क्षितीजा धायगुडे, लावण्या देशपांडे,माहेश्वरी भताने,परिक्षीत पाखरे,प्रिया माळी,प्रियल जोशी,साक्षी जाधव,संस्कृती कापसे,श्रेया दिंडोरे,श्रीकृष्ण माने,सुमेधा शेप,स्वराली महाजन,तनस्वी चौरे,वेदिका कदम इ ग्रेड मध्ये २३ तर उ ग्रेड मध्ये २७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.



विद्यालयाचा शेकडा निकाल १००% लागला आहे.वरील विद्यार्थ्यांना कला शिक्षक उमेश डोंगे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. वरील विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर,संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंतजी वैद्य,मुख्य प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे,खोलेश्वर शैक्षणिक संकुलातील सर्व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष विजय वालवडकर,कार्यवाह किरण कोदरकर, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्षडॉ.अतुल देशपांडे,मुख्याध्यापक तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य बाबुराव आडे,शालेय समितीचे सर्व सदस्य,उपमुख्याध्यापक विवेक जोशी,पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे, पर्यवेक्षक प्रशांत पिंपळे,अभ्यासपुरक मंडळ प्रमुख श्रीकांत देशपांडे,विश्वास पत्की सर्व शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# काँग्रेसची अवस्था बुजगावण्यासारखी

लोकसभा निवडणुकीत भाजपाला आणि भाजपाच्या नेतृत्वातील रालोआला म्हणजे एनडीएला रोखण्यासाठी काँग्रेसच्या नेतृत्वात इंडिया आघाडीची स्थापना करण्यात आली होती. इंडिया हे या आघाडीचे संक्षिप्त नाव आहे. या आघाडीचे पूर्ण नाव आहे 'इंडियन नॅशनल डेव्हलपमेंटल इक्ल्युजिव्ह अलायन्स.' यातील प्रत्येक इंग्रजी शब्दातील पहिले इंग्रजी अक्षर घेत 'इंडिया' हे नाव तयार करण्यात आले; नव्हे भाजपाच्या नेतृत्वातील एनडीएला प्रत्युत्तर म्हणून 'इंडिया' शब्द तयार होईल, असे या आघाडीचे मालगाडीसारखे नाव ठेवण्यात आले, असे म्हणायला हरकत नाही. २००४ ते २०१४ या काळात केंद्रात सत्तेत असताना काँग्रेसने संयुक्त पुरोगामी आघाडी (संपुआ) स्थापन केली होती. संपुआ बरखास्त झाल्याची कोणतीही अधिकृत माहिती नाही. त्यामुळे २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला रोखण्यासाठी इंडिया नावाने नवी आघाडी स्थापन करण्याऐवजी संपुआ आघाडी कायम ठेवता आली असती, पण काँग्रेसने तसे केले नाही. जे पक्ष संपुआत होते, तेच भाजपाविरोधी पक्ष इंडिया आघाडीतही होते. होते असे म्हणण्याचे कारण आता इंडिया आघाडीचे अस्तित्व उरले नाही. त्यामुळे इंडिया आघाडीचे वर्णन 'नव्या बाटलीत जुनी दारू' असे करायला हरकत नाही. दिल्लीतील विधानसभा निवडणुकीच्या मुहूर्तावर इंडिया आघाडीचे राजधानी दिल्लीतील प्रदूषणाने भरलेल्या यमुना नदीत विसर्जन झाले आहे. इंडिया या शब्दाचा आग्रह आता लोकसभेत विरोधी पक्षनेते असलेले काँग्रेसचे राहुल गांधी यांचा होता. तेव्हा ते फक्त काँग्रेसचे नेते होते. भाजपाला दिल्लीतील सत्तेपासून रोखण्यासाठी स्थापन झालेल्या इंडिया आघाडीरूपी फुग्याला दिल्लीतील विधानसभा निवडणुकीच्या आधीच आघाडीतील घटक पक्षांनी काँग्रेसच्या भूमिकेमुळे नाराज होत टाचणी लावली आणि तिच्यातील सर्व हवा काढून घेतली.

लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला सत्तेवर येता आले नसले, तरी भाजपाला स्पष्ट बहुमत मिळण्यापासून रोखण्यात यश आले होते, हे नाकारता येणार नाही. बहुमतासाठी २७२ चा आकडा आवश्यक असताना भाजपा २४० वर अडकली होती. रालोआतील तसेच अन्य काही मित्रपक्षांच्या मदतीने भाजपाने बहुमत गाठत सरकार स्थापन करण्यात यश मिळविले, हा भाग वेगळा. भाजपाला बहुमतापासून रोखणे याच एकमेव उद्देशाने इंडिया आघाडीची स्थापना करण्यात आली होती; तो हेतू पूर्ण झाला. इंडिया आघाडीचा फायदा काँग्रेस आणि समाजवादी पक्ष या दोन पक्षांनाच मिळाला होता. २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत अनुक्रमे ४४ आणि ५२ जागा जिंकणाऱ्या काँग्रेसला २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ९९ जागा मिळाल्या. २०१४ आणि २०१९ मध्ये लोकसभेतील एकूण सदस्य संख्येच्या १० टक्के जागाही जिंकू न शकल्यामुळे काँग्रेसला विरोधी पक्षनेतेपदही मिळू शकले नव्हते. यावेळी ९९ जागा मिळाल्यामुळे काँग्रेसला विरोधी पक्षनेतेपद मिळाले. राहुल गांधी यांच्या गळ्यात आतापर्यंत वरमाळा पडली नसली तरी यावेळी लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपदाची माळ पडली, हेही काही कमी नाही. समाजवादी पक्षाने उत्तरप्रदेशात लोकसभेच्या □८० पैकी विक्रमी म्हणजे ३७ जागा जिंकत इतिहास घडवला. तामिळनाडूत द्रमुक हा इंडिया आघाडीतील आणखी एक घटक पक्ष २२ जागा जिंकत चौथ्या क्रमांकावर आला.

दिल्ली विधानसभा निवडणुकीत आप आणि काँग्रेस हे इंडिया आघाडीतील दोन प्रमुख पक्ष एकदुसऱ्याविरुद्ध दंड थोपटून उतरले. तेव्हाच इंडिया आघाडीत फूट पडल्याचे मानले जात होते. विशेष म्हणजे लोकसभा निवडणुकीत दिल्लीत आप आणि काँग्रेस यांची आघाडी होती. दिल्लीतील सातपैकी या आघाडीला एकही जागा जिंकता आली नाही. म्हणजे तेव्हाही ही आघाडी फुस्स झाली होती. पण नंतर इंडिया आघाडीतील तृणमूल काँग्रेस, समाजवादी पक्ष, राष्ट्रीय जनता दल, शिवसेना उबाठा तसेच नॅशनल कॉन्फरन्स यांनी काँग्रेसला घरचा अहेर करत दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाला पाठिंबा जाहीर केला. या सर्व पक्षांच्या नेत्यांनी काँग्रेसवर टीका केली असली, तरी त्यांचा रोख हा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर होता. आघाडीतील सर्वांत मोठा पक्ष म्हणून इंडिया आघाडी सांभाळण्याचे काम हे काँग्रेसचे आणि त्या पक्षाचे नेते मल्लिकार्जुन खडगे आणि राहुल गांधी यांचे होते, पण हे दोघेही यात अपयशी ठरले. इंडिया आघाडीतील तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी वगळल्या तर अन्य सर्व पक्षांचे नेते तरुण तुर्क आहेत. समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव, राजदचे तेजस्वी यादव, नॅशनल कॉन्फरन्सचे उमर अब्दुल्ला तसेच शिवसेना उबाठाचे उद्धव ठाकरे यांनाही तरुण समजायला हरकत नाही. त्यामुळे या सर्वांशी राहुल गांधी यांनी मैत्रीपूर्ण संबंध ठेवणे अपेक्षित होते; पण राहुल गांधींना ते करता आले नाही. राहुल गांधींचे राजकारण म्हणजे 'मेरी मुर्गी की एक ही टांग'सारखे एकांगी म्हणायला हरकत नाही. राहुल गांधींनी एक नाही तर दोन भारत जोडो यात्रा केल्या असल्या, तरी त्यांना सर्वांना सोबत घेऊन चालता येत नाही. नेता तोच असतो, जो सर्वांना सोबत घेऊन चालतो. पण राहुल गांधींना असे कधी जमले नाही आणि भविष्यात जमेल असे वाटतही नाही. राहुल गांधींच्या या धरसोडीच्या आणि मनमानी भूमिकेमुळे नाराज होत पक्षातील त्यांच्या अनेक जवळच्या मित्रांनी काँग्रेस सोडली. यातील अनेक जण तर त्या काळात राहुल गांधींचे विश्वासू म्हणून ओळखले जात होते. विश्वासू म्हणून ओळखले जाणारे मित्र राहुल गांधींवर फार काळ विश्वास ठेवू शकले नाही तर दुसऱ्या पक्षातील नेत्यांनी राहुल गांधींवर विश्वास ठेवण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्याची परिणती इंडिया आघाडी संपण्यात झाली.

मुळात इंडिया आघाडीची स्थापना लोकसभा निवडणुकीपुरती झाली होती, असे राजदचे तेजस्वी यादव यांनी म्हटले. अप्रत्यक्षपणे त्यांना, लोकसभा निवडणुकीनंतर इंडिया आघाडी बरखास्त करून टाकायला हवी होती, असे म्हणायचे होते. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी काँग्रेसची स्थापना झ होती. त्यामुळे देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काँग्रेस विसर्जित करत नव्या राजकीय पक्षाची स्थापना करावी, अशी महत्त्वपूर्ण सूचना राष्ट्रपिता महा गांधी यांनी केली होती. त्यावेळी महात्मा गांधींची ही इच्छा पूर्ण केली अ तर आज देशात काँग्रेसची जी दयनीय स्थिती झाली आहे, त्यापासून कॉं वाचली असती. पण काँग्रेस विसर्जित करण्याची महात्मा गांधी यांची इच्छा झाली नसली, तरी काँग्रेसच्या नेतृत्वातील इंडिया आघाडी बरखास्त झाल्या भाजपानेच नाही तर देशातील जनतेनेही सुटकेचा श्वास सोडला आहे. क इंडिया आघाडी ही अनेक पक्षांची आघाडी असली, तरी त्यात आपलीच मनमानी काँग्रेस करत होती. लोकसभा निवडणुकीनंतर इंडिया आघाडीची एकही बैठक झाली नाही. लोकसभा निवडणुकीनंतर कोणत्या समान कार्यक्रमावर इंडिया आघाडी काम करेल, याचाही विचार झाला नाही. काँग्रेसच्या दृष्टीने इंडिया आघाडी म्हणजे गाजराच्या पुंगीसारखी होती. वा तर वाजली नाही तर खाऊन टाकली. पण यावेळी काँग्रेसला ही गाजराची खायची संधी मिळायच्या आधीच आघाडीतील अन्य घटक पक्षांनी काँग्रेस शब्दशः नसले तरी राजकीयदृष्ट्या खाऊन टाकले. दिल्ली विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडीतील सर्व घटक पक्षांनी अरविंद केजरीवाल यां आम आदमी पक्षाला पाठिंबा दिल्यामुळे काँग्रेस राजकीयदृष्ट्या संदर्भहीन झ आहे. तिचे राजकीय महत्त्व आणि औचित्य संपले आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीत आणि राष्ट्रीय राजकारणातही काँग्रेसची स्थिती आता शेतात उ केलेल्या बुजगावण्यासारखी झाली आहे. बुजगावण्याला ज्याप्रमाणे कोणत पक्षी भीत नाही, त्याप्रमाणे काँग्रेसला देशातील कोणताही राजकीय पक्ष मो नाही. आपल्या हाताने काँग्रेसने स्वतःची ही दशा नाही तर अवदसा करून घेतली आहे.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# गाव तिथे बांगलादेशी!

मुंबई पोलिस एका तपासामध्ये कोकणातील रत्नागिरीच्या शांत आणि निसर्गरम्य वातावरणात जाऊन पोहोचले. रत्नागिरी म्हणजे रत्नांची नगरी. सावरकर नावाचं रत्न ब्रिटिशांनी याच रत्नागिरीत स्थानबद्ध केलं होतं. आपल्याकडे 'कोकणची माणसं साधीभोळी' असं म्हणतात. मुंबई पोलिसांना असाच काहीसा अनुभव आला. एका गुन्ह्याच्या तपासादरम्यान रत्नागिरीतल्या शिरगावात पोहोचल्यावर त्यांना धक्काच बसला. ज्या बांगलादेशी आरोपीचा शोध त्यांना होता, त्या बांगलादेशी आरोपीकडे रत्नागिरी जिल्ह्यातील शिरगाव ग्रामपंचायतीने दिलेला जन्मदाखला सापडला आणि पोलिसांना कळेना की, कोकणची माणसं इतकी साधीभोळी कशी?

झालं असं की, पोलिसांना एका गुन्ह्याचा तपास करताना आरोपी मोहम्मद इद्रिक इसाक शेखकडे शिरगाव ग्रामपंचायतीचा जन्मदाखला सापडला. या घटनेने रत्नागिरीत एकच खळबळ उडाली आहे. बांगलादेशमधून आलेला एक नागरिक, जो आरोपीही आहे, त्याच्याकडे कोकणातला जन्मदाखला सापडणे ही सर्वसाधारण बाब नसून गंभीर बाब आहे. सगळीकडे वाढत चाललेली मुसलमानांची संख्या ही नैसर्गिक आहे की घुसखोरांनी भारतभर आपले जाळे पसरल्यामुळे वाढलेली आहे. मुंबईतही अचानक ठिकठिकाणी ही संख्या वाढलेली दिसत आहे. त्यांच्या वागण्या-बोलण्यावरून हे नक्की कुठले, असा प्रश्न आपल्या मनात सहज निर्माण होतो. रस्त्याच्या कडेला कपडे विकणारे, विविध ठिकाणी स्टॉल लावणारे हे भारतीय मुसलमान वाटत नाहीत. पण ते भारतीय नावाने सर्रास वावरत असतात. याचं कारण आपल्यातलेच दगाबाज असतात.

कोकणातही तेच झालं. बांगलादेशी आरोपीला कोकणचा भूमिपुत्र बनवण्यामागे स्थानिक लोकांचा हात असल्याची शंका पोलिसांना आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी तत्कालीन सरपंच अल्ताफ संगमेश्वरी आणि ग्रामसेवकांची चौकशी केली आहे. जन्मदाखला कोणत्या आधारावर दिला? जन्मदाखला देण्याचे कारण काय? पुराव्यांची पडताळणी केली की नाही? असे अनेक प्रश्न पोलिसांनी या सरपंचाला विचारल्याचे कळले आहे. तसेच



गटविकास अधिकाऱ्यांनाही याबाबतचा अहवाल सादर करण्याचा आदेश देण्यात आला आहे. या प्रकरणात पोलिसांना यश येऊन आरोपींना शिक्षा होईलच. परंतु ही बाब अतिशय गंभीर आहे. कोकणच्या सुंदर वातावरणाला बिघडवण्याचे हे कारस्थान आहे. कोकणातल्या साध्या भोळ्या लोकांचा गैरफायदा उचलण्याचा हा प्रकार आहे. वरवर पाहता हे एक प्रकरण दिसते. मात्र अशी कितीतरी प्रकरणे 'कानून का लंबा हात' त्यांच्यापर्यंत न पोहोचल्याने दडून गेली आहेत. काही दिवसांपूर्वी बन्ना शेख असे नाव असलेल्या तरुणीने भारतात अनधिकृतरीत्या घुसखोरी करून नाव बदलून ॲडल्ट इंडस्ट्रीत स्थान मिळविल्याचे प्रकरण समोर आले. विशेष म्हणजे ती ॲडल्ट इंडस्ट्रीतली लोकप्रिय अभिनेत्री झाली. तिने 'रिया बर्डे' असे नाव धारण केले होते. रियाचं सबंध कुटुंबच अनधिकृतरीत्या भारतात राहतं. त्यांच्याकडे भारतीय नागरिक असल्याचे बनावट कागदपत्रेही आहेत. या बनावट कागदपत्रांच्या आधारे तिने भारतीय पासपोर्टही बनवला होता. म्हणजे विचार करा ही घाण आपल्या घरापर्यंत येऊन पोहोचली तर नाही ना?

या बांगलादेशींना मदत कोण करतं? तर, आपल्यातलेच काही सामान्य लोक असतात. थोड्याशा पैशाच्या मोहापोटी भारताचं भविष्य विकतात. उच्च पदावर बसलेले अधिकारीही यात सामील असतात. मात्र महाराष्ट्र आणि केंद्र सरकारने घुसखोरांविरोधात मोहीम उघडली असून, त्यांना शोधून पुन्हा मायदेशी पाठविण्याचा विडा उचलला आहे. पण हे काम सोपे नाही. कारण बांगलादेश, पाकिस्तानातून येणारे घुसखोर आपल्यासारखेच दिसतात. ते पूर्वाश्रमीचे भारतीयच, नव्हे, पुढे जाऊन म्हणायचं तर ते पूर्वाश्रमीचे हिंदूच. त्यामुळे भारतीय मुसलमान आणि घुसखोर यांच्यात सहसा फरक करता येत नाही. त्यात हे भारतीय हिंदू नाव घेऊन वावरत असतात. त्यामुळे हे काम अत्यंत त्रासदायक आणि कठीण आहे. यासाठी पोलिसांचं एक वेगळं पथक नेमावं लागणार आहे. त्याशिवाय या घुसखोरांना बाहेर हाकलता येणार नाही.

हे घुसखोर विविध क्षेत्रांत कार्यरत झाले आहेत. कुणी मजूर झाला, कुणी मासे विक्रेता, कुणी ठेला टाकला, तर कुणी कापड विक्रेता. विशेष म्हणजे महत्त्वाच्या रोजंदारीत आणि व्यवसायात यांनी शिरकाव केल्याचा संशय असल्यामुळे भारतात घुसखोरांची एक इको-सिस्टिम तयार झालेली असावी. ही इको-सिस्टिम भारताला पुढे धोकादायक ठरू शकते. कारण यांच्या बचावासाठी स्वयंघोषित पुरोगामी पुढे येणारच आहेत! आपल्याकडे म्हण आहे 'गाव तिथे उकिरडा.' आता 'गाव तिथे बांगलादेशी' असं म्हणण्याची पाळी आली आहे; नव्हे, 'घर तिथे बांगलादेशी' असेच म्हणावे लागेल. कारण आपल्या घराच्या बाजूलाही कुणी बांगलादेशी राहत असेल तर 'मला काय त्याचे?' या गुंगीत वावरणाऱ्या आपल्यासारख्या सामान्य माणसांना काही खबरबात लागणार आहे काय? आपण भलं आणि आपलं काम भलं हे सभ्य-सज्जन माणसाचं ब्रीदवाक्य आहे. पण भल्या माणसा, तुझ्या येणाऱ्या पिढीचं वाटोळं होत आहे अशा वागण्यामुळे, त्याचं काय? पण भल्या माणसाला याचं काय? तो तर नाकासमोर बघून चालणारा सज्जन आहे. असो! पण अचानक वाढणारी बांगलादेशी आणि इतर घुसखोरांची संख्या ही सामान्य बाब नाही. हा भविष्यातील मोठ्या कटकारस्थानाचा ट्रेलर असू शकतो. उद्या हे घुसखोर आम्हाला वेगळा देश द्या अशी हिंसक मागणी करणार नाहीत, याची शाश्वती कुणी देऊ शकतो काय?.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**नीलेश जोशी**

# गोवंशाची हत्या, मानसिक विकृती

**गोपालांचा देश भारत, आला गाई-गुरे पूजित**
**परंतु गाई झाल्या खात, लक्षची नाही तयांकडे ॥**

ग्रामगीतेतून वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी गोवंश हत्येच्या विकृती या ओवींमधून लक्ष वेधले आहे. दुर्दैवाने आजही त्यांनी व्यक्त केलेल्या ग मुद्याकडे लक्ष नसल्याचेच दिसून येते. खरं म्हणजे शासनाने राज्यात संपूर्ण गो हत्याबंदीचा कायदा केला. एवढेच नव्हे तर गो-मातेला 'राज्यमाता-गोमाता' अ दर्जाही प्रदान केला. पण गोवंशाची दररोज, सर्रास होणारी कत्तल अद्याप थां नसल्याचे चित्र आहे. राज्य शासनाने याबाबत सकारात्मक निर्णय घेत गोवंश हत्या थांबविण्यासाठी पुढाकार यापूर्वीच घेतला असला तरी पोलिस प्रशासना काहींच्या खाऊगिरी वृत्तीमुळे गोवंशाची कत्तल सुरूच आहे. अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यात उघडकीस आलेल्या प्रकारामुळे हा मुद्दा पु चर्चेत आला.

तेल्हारा तालुक्यात मंगळवारी मालवाहू वाहन नादुरुस्त झाले. या मार्गाव ये-जा करणाऱ्या अनेकांच्या नजरा त्यावर पडल्या. पण सजग असणाऱ्या काह वाहनातून दुर्गंधी आली. त्यांनी थांबून त्याची चौकशी सुरू केली. त्यात थोड अधिक धाडस दाखवून समोर आलेल्यांनी वाहनात असलेल्या पोत्यात काय अ ते पाहण्यासाठी पोते उघडले आणि सर्वांनाच धक्का बसला. मालवाहू वाह असलेल्या पोत्यात गोवंशाची शिंगे होती. सतर्क असलेल्या नागरिकांनी पो प्रशासनाला ही बाब कळविली. पोलिस प्रशासनानेही तत्काळ कारवाई के पोत्यांमध्ये गोवंशाची शिंगे असल्याचे समोर आले होतेच. पण असंवेदनशी कशी असते याचाच अनुभव येथे आला. पोलिस प्रशासनाने एकीकडे गोवंश कत्तल झाली हे स्वीकारले पण किती गोवंशाची कत्तल झाली याची खातरजम करता १६ क्विंटल गोवंशाची शिंगे आढळल्याचे म्हणत पोलिस मोकळे झ माध्यमात आणि काही सामाजिक कार्यकर्त्यांनी जेव्हा याबाबत विचारणा के तेव्हा दुसऱ्या दिवशी पोलिसांनी गोवंशाची शिंगे मोजली. तब्बल ९ हजार ८ शिंगे या वाहनात होती. म्हणजेच साधरणतः ४ हजार ९०० गोवंशाच्या कत्तलीनंतर या शिंगांची विल्हेवाट लावण्याकरिता ती नेली जात होती. अगदी स्पष्टच बोलायचे तर सुमारे ५ हजार गोवंशाची कत्तलीचा हा प्रकार पोलिस १६ क्विंटल शिंगे म्हणून गुंडाळला होता. कित्येक वर्षांपासून सुरू असले गोवंश कत्तलीमुळे देशी गाईंची संख्या झपाट्याने कमी झाली. देशी गाईंच्या क प्रजाती तर नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. २०१९ मध्ये झालेल्या पशुगणनेत केवळ ४६ लाख १३ हजार ६३२ देशी गाई असल्याचे समोर अ यात धक्कादायक बाब म्हणजे यापूर्वीच्या पशुगणनेशी तुलना केली असता संख्या २०.६९ टक्क्यांनी घटली.

कृषी आधारित ग्रामव्यवस्था आणि गोवंश आधारित कृषी व्यवस्था हे आपल्या देशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचे वैशिष्ट्य. ही व्यवस्था, वैशिष्ट्य का राहावे याकडे भारतीय चिंतनातून कृषी व्यवस्थेचा विचार करणाऱ्या तज्ज्ञांनी वेळोवेळी लक्ष वेधले आहे. वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेचा वा अध्याय गो-संगोपन, संवर्धन, रक्षण या महत्त्वाच्या विषयावर लिहिला अ राज्यातील संत परंपरेसह कृषी आधारित ग्राम व्यवस्था बळकट व्हावी म्हणून प्रयत्न करणाऱ्या सर्वच महानुभावांनी वेळोवेळी जनजागरण केले. पण तरीही स्वातंत्र्योत्तर काळात केवळ गठ्ठा मतांच्या लालसेपोटी स्वार्थी राजकारण्यांनी गोरक्षण, गोसंवर्धन याकडे दुर्लक्ष केल्याचा इतिहास आहे. त्यामुळे स्वातंत्र्ये काळात झपाट्याने देशी गाईंची संख्या रोडावली. शेती आधारित अर्थशास्त्र गती देणारी, विज्ञानाच्या कसोटीवर मानवाला उपयोगी असलेली देशी गाय, गोवंश वाचावा म्हणून शासनाने राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा केला. तर गाईचे संगोपन, संवर्धन व्हावे या हेतूने देशी गाईला 'राज्यमाता-गोमाता' अ दर्जा दिला. असे असले तरी अखिल मानव जातीला उपकारक ठरणाऱ्या गोवंशाची कत्तल केवळ जिव्हेचे चोचले पूर्ण करण्यासाठी केली जाते. नव्हे ध मानसिकतेचे प्रदर्शन करीत येथील बहुसंख्य समाजाला कमी लेखण्यासाठी गो हत्या केली जाते. ज्या वृत्तीला मानव जातीचे कल्याण कळत नसेल ती वृत्ती विकृतच म्हणावी लागेल. या विकृतीवर लगाम लावण्यासाठी तेल्हाऱ्यात घडले घटनेचा सखोल तपास व्हावा. गोवंश कत्तलीच्या हेतूने राज्यात होणारी वाहत अवैध कत्तल बंद व्हावी तरच गोवंश हत्याबंदी कायद्याचा उपयोग होऊन 'राज्यमाता-गोमाता' हा गाईला दिलेला दर्जा सार्थकी लागेल.

९४२२८६२४

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# खाट कुरकुरतेय्!

महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी खाट कुरकुरतेय् अशा शब्दात काँग्रेसवर टीका केली होती. आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी राज्यातील परिस्थिती पाहिली तर उबाठा गट अजून झोपेतून जागा व्हायला तयार नाही. काँग्रेसची मोडलेली पाठ सरळ व्हायला तयार नाही, अशी टीका काँग्रेस आणि उबाठा गटावर केली आहे. मग काँग्रेसचे नेते माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी कोल्हेंवर पलटवार करत शरद पवार गटाला लक्ष्य केले. दुसरीकडे दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत आम आदमी पक्ष आणि काँग्रेस स्वतंत्र निवडणूक लढत आहे आणि महत्त्वाचं म्हणजे, तृणूमूल काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि आता अलिकडेच ठाकरे गटाने आम आदमी पक्षाला समर्थन दिलं आहे. यावेळी राज्यातील महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांमध्ये बेबनाव उघडपणे समोर आला असून, दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीवरून इंडिया आघाडीमध्ये देखील कुरबुर सुरू असल्याचे उघड झाले आहे. याचाच सरळसरळ अर्थ यावेळी इंडिया आघाडी आणि महाविकास आघाडीची खरंच खाट कुरकुरत आहे, हे स्पष्ट झाले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वीच पुन्हा एकदा महाविकास आघाडीमधील घटक पक्षांमधील वाद चव्हाट्यावर आल्याचं चित्र सध्या पाहायला मिळत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार अमोल कोल्हे यांनी गुरुवारी मुंबईत झालेल्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीमधील भाषणात महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या काँग्रेस आणि उद्धव ठाकरेंच्या गटाला टोला लगावला आहे. तर, काँग्रेसच्या वडेट्टीवारांनी उबाठा आणि शरद पवार गटावर जोरदार हल्ला चढवला. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवानंतर महाविकास आघाडीमध्ये 'ऑल इज नॉट वेल' असल्याचं दिसत आहे. महाविकास आघाडीमधील घटक पक्ष आगामी निवडणुका वेगळ्या लढण्याच्या तयारीत दिसत आहेत.

अशातच मविआतील या संघर्षाची चर्चा रंगू लागली ती आता मविआचा



विधानसभा निवडणुकीतील पराभव आणि त्याआधी झालेल्या जागा वाटपांच्या बैठकांवरून काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केलेल्या खळबळजनक आरोपामुळे.

विधानसभा निवडणुकीत जागावाटपाची चर्चा २० दिवस चालली, यात काही षडयंत्र होतं का? असे सर्वांत मोठे विधान विजय वडेट्टीवार यांनी केलं. नाना पटोले, संजय राऊत हे चर्चा करत होते. आम्हीही होतो, जागावाटपाचा तिढा दोन दिवसांत संपला असता तर १८ दिवस आम्हाला प्रचारासाठी मिळाले असते. असं ते म्हणाले. जागावाटपात इतका वेळ वाया घालवला, यामध्ये काही प्लॅनिंग होतं का? बैठक ११ वाजता असायची आणि यायचे दोन वाजता. अनेक नेते उशिरा यायचे. २० दिवस हा जागा वाटपाचा घोळ चालला. त्यामुळे फटका बसला.

२० दिवस जागावाटपात वेळ घालवण्यात काही षडयंत्र होतं का? यात वाव आहे. अशी शंका विजय वडेट्टीवारांनी व्यक्त केली. त्याचवेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार अमोल कोल्हे यांनी केलेल्या विधानावरूनही महाविकास आघाडीमध्ये जोरदार जुंपल्याचे पाहायला मिळत आहे. राज्यातील परिस्थिती पाहिली तर ठाकरे गट झोपेतून जागा व्हायला तयार नाही. काँग्रेसची मोडलेली पाठ अजून सरळ व्हायला तयार नाही. आपल्याकडे लढणारे शरद पवार आहेत. सध्या विरोधी पक्षात मोठी जागा शिल्लक आहे, त्यामुळे ''बचेंगे तो और भी लडेंगे'', असं ते म्हणाले. यावरून काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी अमोलरावांनी आपल्या पक्षाकडे थोडं अधिक लक्ष द्यावं आणि आम्हाला सल्ला थोडा कमी द्यावा, अशा शब्दांत अमोल कोल्हेंवर पलटवार केला. त्यामुळेच विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर मविआमध्ये काही आलबेल नसल्याचे चित्र दिसत आहे.

मागील काळात जुनी खाट कुरकुरतेय् अशी टीका संजय राऊतांनी केली होती. मात्र, यावेळी तर अवघ्या दोनचार वर्षे जुनी खाट कुरकुरताना दिसत आहे. ही कुरकुरणारी खाट आता कधी तुटून कोलमडेल याची काहीही शाश्वती राहिलेली नाही. तसेही भिन्न विचारांच्या लोकांनी मिळून केवळ राजकीय स्वार्थासाठी केलेल्या या तिघाडीत विचारांची उणीव होतीच. आता सत्ता हातून तर गेलीच शिवाय नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवानंतर आत धुमसत असलेली आग आता भडक्यात रूपांतर होण्याच्या तयारीत दिसत आहे. यावेळी एक गोष्ट भारी वाटली ती म्हणजे, नेहमी उबाठा गटाचे बोलघेवडे संजय राऊत इतरांवर हल्ला चढवण्याचा शहाणपणा करत होते. त्यांच्यावर यावेळी पहिला हल्ला करण्याचे धाडस म्हणा किंवा सुरुवात म्हणा यावेळी खा. अमोल कोल्हे आणि आ. विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. आता यात अनेक इतरही नेते अर्थात दुसरी फळी संजय राऊत आणि उबाठा गटाच्या नेत्यांचे कपडे उतरवायला तयारच असतील. यात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट ही मूळ समविचारी आघाडी असल्याने, ते एकमेकांवर शरसंधान साधणार नाहीत. अर्थात तेवढे पथ्य ते पाळतील.

मात्र, दोघेही मिळून ठाकरेंच्या गटाला आणि राऊतांच्या तोंडाला आता ते निपटवतील हीच शक्यता अधिक दिसते. यावेळी झालेली सुरुवात आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपर्यंत वणव्यात रूपांतर होण्याची शक्यता असून, या वणव्याच्या उसळणाऱ्या आगीत वाळल्यासोबत ओलंही जळेल यात शंका नाही.

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### कुंभमेळा म्हणजे मन आणि देहाची शुद्धी

१३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत प्रयागराज येथे कुंभमेळ्याचे आयोजन करण्यात येत आहे. कुंभमेळा म्हणजे जगातील सर्वांत मोठी धार्मिक यात्रा; ज्यात हिंदू संस्कृतीची महानता अनुभवायला मिळते. हिंदू एकतेचे प्रतीक असलेल्या या मेळ्यात फक्त हिंदू भाविकच नव्हे, तर ऋषी-मुनी आणि संतदेखील सहभागी होतात. त्यामुळे आध्यात्मिक दृष्टीने कुंभमेळ्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

कुंभमेळा या शब्दातील 'कुंभ' म्हणजे मातीचा घडा (मडके), जो मातीपासून तयार होतो तसेच मनुष्याचे शरीरही पंचमहाभूतांपासून निर्माण झालेले आहे आणि मृत्यूनंतर त्यातच विलीन होत असल्याने कुंभाला मानवी देहाचे प्रतीक मानले जाते. या देहामध्ये काम, क्रोध, मद, मत्सर, वासना, अहंकार अशा अनेक दोषांनी भरलेले मन असते. अशा वासनांनी भरलेला कुंभ रिकामा करण्याचे स्थळ म्हणजे कुंभमेळा! कुंभमेळ्यात संपूर्ण भारतातील संतांच्या सत्संगाचा लाभ प्राप्त होत असतो. संतांचे दर्शन, मार्गदर्शन आणि प्रयागराज येथील त्रिवेणी संगमातील पवित्र स्नान आपल्यातील अहंकार आणि दोष कमी करण्यास मदत करते. तेव्हा स्वभावदोषांनी भरलेले शरीररूपी कुंभ रिकामे करून; आपल्या आध्यात्मिक प्रगतीबरोबरच, शरीर आणि मनाची शुद्धी करून घेण्यासाठी कुंभमेळ्याचा लाभ सर्व भाविकांनी निश्चितच करून घ्यायला हवा.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

●● ●●

### घरबसल्या आयुष्मान कार्ड

शासनाने ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी काही आजारांवर नि:शुल्क उपचार जाहीर केले आहेत. दवाखान्यांची यादी जाहीर केली आहे. त्यामुळे ज्येष्ठांना खूप दिलासा मिळाला आहे. निवडणुकीपूर्वी मी प्रताप नगर येथे नक्षत्र सभागृहात गेली होती. तेथे जिना चढताना खूप त्रास झाला व वर गेल्यावर बसायला जागा नाही. खूप संताप आला. त्याच वेळी समाजसेविका चित्रा घाटेकर यांनी निवडणुकीनंतर घरपोच आयुष्मान कार्ड देण्यात येईल असे आश्वासन दिले. भाजपाचा विजय झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सौजन्याने व ओएसडी सुनील मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली विकास खेडकर, योगेश घोटकर व चित्रा घाटेकर यांनी घरी जाऊन अवघ्या नगरातील कार्डाची प्रक्रिया पूर्ण केली व आयुष्मान कार्ड घरी आणून दिले. ज्या पक्षात असे निष्ठावंत कार्यकर्ते आहेत त्यांचा विजय निश्चितच आहे.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

●● ●●

### जुनी पेन्शन, आमचा हक्क

महाराष्ट्र सरकारने १ जानेवारी २००४ रोजी राज्य सरकारी व निमशासकीय कर्मचाऱ्यांना देण्यात येणारी जुनी पेन्शन योजना सरसकट बंद केली. त्यामुळे या निर्णयाचा तोटा असंख्य कर्मचारी वर्गाला व त्यांच्या कुटुंबीयांना झाला आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे निवृत्ती नंतरचे आयुष्य कसे असेल? किंवा ते कसे जगायचे? हा मोठा प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहिला. त्याचबरोबर कर्मचारी वर्गाकडून असंख्य वेळेला आंदोलने करण्यात आली. पण सरकारकडून वारंवार फक्त आश्वासनेच मिळत गेली. अंमलबजावणी मात्र दूरच राहिली. त्यामुळे सर्वच कर्मचारी संघटना मला वाटते की, आंदोलने करून थकल्या



आहेत.

मागच्या वर्षी विधानसभा निवडणुका तोंडावर आल्या असता महायुती सरकारने राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठी नवीन सुधारित पेन्शन योजनेची घोषणा केली. पण या नवीन योजनेमध्ये अनेक अटी व शर्ती ठेवल्या गेल्या. त्यामुळे या योजनेचा फायदा सरसकट सर्वांना होणार नाही. त्याचबरोबर सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा संविधानामधील हिताच्या संबधित नोंदीचे दाखले देऊन महाराष्ट्र राज्य सरकारला फटकारत असताना म्हटले होते.की, जुनी पेन्शन योजना हा प्रत्येक कर्मचाऱ्याचा हक्क आहे आणि तो हक्क त्यांच्याकडून कोणीही हिरावू शकत नाही.

राज्यात एका बाजूला शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू आहे व दुसऱ्या बाज नवीन कर्मचाऱ्यांना लागू नाही. मग असा भेदभाव का? अ प्रकारचे असंख्य सूर कर्मचारी वर्गातून येत आहेत. त्याचबरोबर त्यांना नवीन पेन्शन योजना लागू असल्याम निवृत्तीनंतरचे त्यांचे आयुष्य खूपच खडतर असणार आहे. कारण, कोणताही कर्मचारी निवृत्त झाल्यानंतर त्याला आधाराबरोबर पैशांची पण गरज भासते आणि सर्वांत महत्त म्हणजे उतार वयात प्रत्येक व्यक्तीच्या मागे विविध स्वरूपाच्या व्याधी लागतात. जर, वेळेवर पैशाअभावी उप झाले नाहीत तर, काय परिणाम होऊ शकतात हे सांगण्य गरज नाही. नवीन पेन्शन योजनेनुसार त्यांना निवृत्तीनंतर भविष्यात मिळणारी पेन्शनची रक्कम खूपच तटपुंजी अस आहे. या मिळणाऱ्या तटपुंज्या रकमेतून ते सर्व कर्मचारी आपला स्वतःचा उदरनिर्वाह करू शकणार नाहीत. त्या महाराष्ट्र राज्य सरकारने सरसकट जुनी पेन्शन योजना त करावी, ही अपेक्षा.

**प्रा. सचिन जाधव**/८४२५००३१२७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### जिल्हा परिषदेत १२ ते २६ जानेवारी दरम्यान योग शिबीराचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य उत्तम ठेवण्यास मदत व्हावी यासाठी जिल्हा परिषदेच्या प्रांगणात स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त १२ ते २६ जानेवारी दरम्यान भव्य योग शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नतिशा माथुर यांच्या संकल्पनेतून तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राहुल गिते व आयुष अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर वडमिलवार यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबीराच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाच्या प्रांगणात नियोजना करिता बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला निरामय योग केंद्राचे अध्यक्ष डॉ. राहुल झांबड, आरोग्य वर्धिनीचे योग प्रशिक्षक गजानन चौधरी, सचिन रायपत्रीवार, सुंदरदास मोरे, विद्याताई खंदारे, वसंत पारवे, अशोक तळेकर, चंद्रकांत देशमुख, कैलास बेले, सोनी सोळंके, पूजा ढाकरगे आदींची उपस्थिती होती.

शिबिरात सहभाग घेणाऱ्या जिल्हा परिषदेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना निरामय योग प्रसार संशोधन केंद्राचे तसेच आरोग्य वर्धिनी व आयुष केंद्राचे योग प्रशिक्षक व योग शिक्षक विविध यौगिक क्रिया, प्राणायाम, ध्यानक्रिया आदींबाबत प्रात्याक्षिकासह मार्गदर्शन करणार आहेत. या शिबिराचा जिल्हा परिषद अधिकारी व सर्व कर्मचाऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### उत्कर्ष विद्यालयात भरला आठवडी बाजार

**सेलू,/प्रतिनिधी :** येथील श्रीराम प्रतिष्ठान संचलित उत्कर्ष विद्यालयात शनिवार ११ जानेवारी रोजी नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत आठवडी बाजार भरला होता. यामध्ये शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

हा आठवडी बाजार भरण्याचे कारण असे की, गणितातील काही संकल्पना लक्षात याव्यात जसे की लिटर, किलो, ग्रॅम, यासंदर्भातली माहिती व रोजच्या दैनंदिन जीवनात याचा वापर शेतकऱ्यांचा व्यवहार व त्याांची मेहनत हा आठवडी बाजार भरण्याची प्रमुख कारण होते. या आठवडी बाजारसाठी प्रमुख म्हणून श्रीराम प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय रोडगे, संस्थेच्या सचिव डॉ. सविता रोडगे यांच्यासह उत्कर्ष विद्यालयाचे मुख्यध्यापक कैलास ताठे, ज्ञानतीर्थ माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक हरिभाऊ कांबळे यांची उपस्थिती होती. या आठवडी बाजारात शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. हा उपक्रम गणित विषयांतर्गत घेण्यात आला होता. या उपक्रमासाठी गणित विषयाच्या शिक्षकांनी परिश्रम घेतले.

### सोनपेठ-शिर्डी पायी पालखीचे २५ जानेवारीला प्रस्थान होणार

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** सोनपेठ शहरातील श्री साई द्वारकामाई परिवाराच्यावतीने सोनपेठ ते शिर्डी पाई पालखी सोहळ्याचे याही वर्षी आयोजन करण्यात आले असून शनिवार २५ जानेवारी रोजी पालखीचे शिर्डीकडे प्रस्थान होणार आहे. साई पालखीचे हे ९ वे वर्ष आहे.

२५ जानेवारी सकाळी ८ वाजता शहराचे ग्रामदैवत हनुमान मंदिर, हनुमान चौक येथून पालखीचे प्रस्थान होणार असून सांगता शिर्डी येथे बुधवार ५ फेब्रुवारी रोजी होणार आहे. ११ दिवस चालणाऱ्या या पालखी सोहळ्यात अकरा मुक्काम असून चहा, नाश्ता, भोजनाची व्यवस्था भक्तांकडून करण्यात आली आहे.

२५ रोजी प्रस्थान होणाऱ्या साई पालखीची शहरातून मिरवणूक काढण्यात येणार असून पालखीचे खालील ठिकाणी मुक्काम असणार आहेत. संत तुकाराम महाराज मंदिर टाकळगव्हाण, छोटेवाडी, माऊली फाटा, शिरसदेवी, बाग पिंपळगाव, सुकळी, येवले वस्ती, कुकाणा, साईनाथ नगर, गोंदवणी, श्री स्वामी नित्याानंद गोविंद गिरीजी सिध्द आश्रम शिर्डी व साईबाबा मंदिर असा प्रवास राहणार आहे. पालखी सोहळ्यामध्ये सहभागी होणाऱ्या साई भक्तांनी २० जानेवारी पर्यंत ८७८८९२३१४०, ९४२३७३७७८४, ९४२१०८४४६६, ९४२०८८४८८८, ९०४९१७४२८५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन श्री साई द्वारकामाई परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

### विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासात पालक-शिक्षकांची भूमिका महत्वाची

#### व्यंकटेश तोरंबेकर : मराठवाडा हायस्कूलमध्ये पालक मेळावा

**मानवत,/प्रतिनिधी-** विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व अभ्यासातील प्रगती कशी साध्य करता येईल, यासाठी पालक व शिक्षक यांची महत्त्वाची भूमिका आहे, असे मत नूतन विद्या समितीचे संचालक व्यंकटेश तोरबेकर यांनी व्यक्त केले.

नूतन विद्या समिती संचलित मराठवाडा प्राथमिक शाळा खंडोबा बाजार येथे शनिवार ११ जानेवारी रोजी पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्षीय भाषणाप्रसंगी तोरंबेकर बोलत होते. यावेळी पवन जाधव यांनी आपल्या प्रास्ताविकातून शाळेच्या वर्षभरातील कार्यक्रमाचा लेखाजोखा मांडला. पालक प्रतिनिधी सौ. ठाकूर ताई यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचलन कु. मोहिनी ढाकरगे यांनी केले. तर आभार प्रदर्शन सौ. संगीता मोरे यांनी केले तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी सौ. शिवगगंगा तालडे, सौ. मीना ढगे, सौ. भारती यांनी परिश्रम घेतले. यावेळी मोठ्या संख्येने पालकांची उपस्थिती होती.

### १३ ते १६ जानेवारी स्काऊट गाईडचा मेळावा

**परभणी,/प्रतिनिधी-** परभणी भारत स्काऊटस् आणि गाईड्स जिल्हा कार्यालय तथा शिक्षण विभाग जिल्हा परिषद व नवरचना प्रतिष्ठाण जिंतूर रोड परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने १३ ते १६ जानेवारी दरम्यान स्काऊटस् आणि गाईड्सचा ४३ वा जिल्हा मेळावा आयोजीत करण्यात आला आहे. हा मेळावा नवरचना प्रतिष्ठाण, कृषि विज्ञान केंद्राजवळ, जिंतूर रोड येथे होणार आहे. मेळाव्याचे स्वागताध्यक्ष प्राचार्य प्रल्हाद मोरे व प्राचार्या गंगासागर मोरे हे आहेत. १४ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता मेळाव्याचे उद्घाटन आ. डॉ. रताकर गुट्टे यांच्या हस्ते होणार आहे.

तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी


❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया

छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी

खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

# कर्मयोग भारतीय संस्कृतीची प्रेरणा - श्रीमद जगद्गुरु हंपी विरुपाक्ष

## श्रीक्षेत्र टाकळी येथील आशीर्वचन कार्यक्रम





**संपत तेली**

**पूर्णा ,/प्रतिनिधी-:** फळाची अपेक्षा न करता कार्य करण्याची प्रेरणा भारतीय संस्कृती देते. श्रेष्ठ ऋषिमुनींनी मानवी जीवनाच्या सार्थकतेसाठी कर्मयोगाचे मार्गदर्शन केले. त्याातील अनेक बाबींचे सखोल व समर्पक चिंतन व आचरण होण्याची गरज आहे ,अशी अपेक्षा हम्पीपीठाचे श्रीमद जगद्गुरु शंकराचार्य हम्पी विरुपाक्ष (कर्नाटक) यांनी १० जानेवारी गुरुवारी रोजी व्यक्त केली.

श्रीक्षेत्र धनगर टाकळी येथे सद्गुरु दाजी महाराज जन्मोत्सव व सच्चिदानंद वेद स्वाध्याय प्रतिष्ठानचा रौप्य महोत्सव निमित्ताने आयोजित सोहळ्यात आशीर्वचन प्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर भागवतभूषण ज्योतिषाचार्य पंडित अतुल शास्त्री भगरे गुरुजी उपस्थित होते.

प्रारंभी वेदमूर्ती उमेशमहाराज व सौ अपर्णा टाकळीकर वेदमूर्ती अवधूतमहाराज व सौ अश्विनी टाकळीकर यांच्या हस्ते श्रीमद जगतगुरूंची वैदिक मंत्राघोषात विधिवत पाद्यपूजा झाली. संयोजकांच्या वतीने पुष्पार्चन करून जगदगुरुंना मानवंदना दिली. कुंकुमार्चनही करण्यात आले .

उपस्थित जनसमूहास आशीर्वचन देताना जगद्गुरु म्हणाले की,'' भारतीय संस्कृतीतील भगवान श्रीकृष्ण परमात्मा यांनी मानवी जीवन कसे चालावे यासाठी एक मॅन्युअल दिले ते म्हणजे भगवदगीता होय. त्त्याा मानवी जीवनाला सार्थकता प्राप्त करून देणारा '' कर्मण्ये वाधिकारस्ते... '' हा श्लोक जीवनाचा मूलमंत्र होय. श्रीकृष्णांनी दुष्कर्म करणाऱ्या कंस, जरासंध, नरकासुर यासह अनेकांचा संहार केला. कौरव पांडव युद्धातही कौरवांना सैन्य दिले तर अर्जुनाचे सारथ्य केले. या कोणत्याही बाबीत यशप्राप्तीनंतर फळाची अपेक्षा केली नाही. ऊक्ती व कृतीत एकवाक्यता ठेवून केवळ निष्काम कर्मयोगाची दीक्षा दिली. हेच त्त्वा मानवी जीवनात आचरणात आले पाहिजे.'' सर्वे जना सुखीनः भवन्तु '' हा आशीर्वाद त्याातून फलद्रूप होईल, असा विश्वास जगदगुरुंनी व्यक्त केला. भारतीय संस्कृतीतील विविध बाबी व विज्ञान यांचाही सहसंबंध स्पष्ट करीत त्यांनी गंगाजल ,मंत्राभिषेक नामस्मरण इत्यादींचे महत्त्व प्रतिपादित केले. धैर्य, साहस शक्ती व मुक्ती पैशाने मिळत नाही ती केवळ नामस्मरणाने मिळेल, हे त्यांनी स्पष्ट केले.

**रक्तदाते बनले जगद्गुरु..**

हंपी पीठाचे जगद्गुरु शंकराचार्य हंपी विरुपाक्ष यांनी टाकळी येथे चाललेल्या सोहळ्यातील विविध उपक्रमांची माहिती घेतली. आरोग्य शिबिरास भेट दिली.एवढेच नव्हे तर स्वतः रक्तदानही केले.

तसेच येथील संतवर्य गंगाजीबापू गोसेवा प्रकल्पाची पाहणी केली. गोसेवेच्या कार्याचा गौरवही केला. गोसेवेचे हे कार्य भारतभर विस्तारित होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

## सेलूमध्ये जनजागरण सभा

**सेलू,/प्रतिनिधी :** दारू थांबविण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तींच्या मद्यमुक्तीसाठी शनिवारी, ११ जानेवारी रोजी सेलू शहरात मोफत जनजागरण सभा आयोजित करण्यात आली आहे.



अल्कोहोलिक्स अॅनॉनिमस (ए.ए.) या जागतिक स्तरावरील संस्थेद्वारे सेलू शहरातील सप्तपदी मंगल कार्यालय अँड लॉन्स, मिनाक्षी टॉकीज समोर, पारिजात कॉलनी, वृंदावन नगर येथे शनिवारी, ११ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता मोफत जनजागरण सभा आहे. या सभेस दारू थांबविण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तींनी, त्यांच्या कुटुंबियांनी, हितचिंतकांनी आवर्जून उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे. यावेळी मोफत पुस्तिका वितरीत करण्यात येणार असून माहितीही दिली जाणार आहे.

जनजागरण सभेबाबत अधिक माहितीसाठी हेल्पलाईन क्रमांक ९४२३१४२९९१, ९७३०३८२८७८, ९४२१४६१७२७, ७४९९०७७०४७ आदींशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## सोनपेठ शहरातील रस्त्यांचा चेहरामोहरा बदलला- नागरिकांत आनंद निर्माण

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** शहरातील विविध भागात सिमेंट रोड,नाली बांधकाम आणि हॉटमिक्स चे डांबरीकरण करण्यात येत आहे. त्यामुळे लखलखते सोनपेठ शहर पाहून सर्वसामान्य नागरिकांत आनंद होताना दिसत आहे.परंतू शहरांमधून जाणारा राष्ट्रीय महामार्ग ५४८ (ब) ची दयनीय अवस्था पाहून त्याची खंतही मनाला बोचत आहे. मागील १० वर्षांपासून सोनपेठ शहराचा सर्वांगीण विकास होताना दिसत असून, नागरीकांच्या मुलभूत सुविधां पैकी रस्ते,नाली बांधकाम, पिण्याचे पाणी, सांडपाणी व्यवस्थापन आणि विद्युत रोषणाई यामुळे सोनपेठ शहर झगमगत आहे.

त्याातच यावेळी नवनिर्वाचित आमदार राजेश विटेकर यांच्या नेतृत्वाखाली माजी नगराध्यक्ष चंद्रकांत राठोड यांनी सोनपेठ शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी विविध कामांचा झपाटा लावला आहे. सध्या सोनपेठ शहरातील विविध भागांमध्ये पक्के सिमेंट रोड चे रस्ते आणि सांडपाणी व्यवस्थापनासाठी काँक्रेट नाली बांधकाम करण्यात येत आहे. तसेच परळी रोड वरील कराड कॉम्प्लेक्स पासून सुरू होणारा रिंग रोड पुढे बुरांडे पेट्रोल पंप,महालिंगेश्वर महाविद्यालय, ग्रामीण रुग्णालय ते तहसील कार्यालय समोरील मुख्य पाथरी रोड पर्यंतचे हॉटमिक्स डांबरीकरण चा पहिला टप्पा पार पडला आहे. मारवाळ यांची लाकडी मशिन ते ईंडेन गॅस एजन्सी कार्यालय पर्यंत चा रिंग रोडही हॉटमिक्स डांबरीकरण करण्यात आला आहे.त्याानंतर शहरातील पोलीस स्टेशन, ग्रामीण रुग्णालय परिसरातील रस्ते आणि ईतर भागातील प्रमुख रस्त्यांवर हॉटमिक्स डांबरीकरण करण्यात येणार असून शहरात सर्वत्र सौर पथदिवे बसविण्यात येणार असल्याचे माजी नगराध्यक्ष चंद्रकांत राठोड यांनी सांगितले. आगामी नगर परिषद निवडणुकीत विरोधकांना विकासात्मक मुद्दा मांडण्यासाठी कुठलाही पर्याय शिल्लक ठेवणार नसून आमदार राजेश विटेकर यांच्या माध्यमातून सोनपेठ शहराला मेट्रो सिटी बनवण्याचा प्रयत राहील असे श्री राठोड यांनी सांगितले.



सोनपेठ शहराचा नगर परिषदेच्या माध्यमातून विकास होत असला तरी शहराच्या मध्यवर्ती भागातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ (ब) ची मात्र दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहने निसटून लहान मोठे अपघात घडत आहेत. गेली अनेक वर्षांपासून मंजूर झालेल्या या राष्ट्रीय महामार्गावरील दुरुस्ती साठी कुठलेच बजेट पडत नसल्यामुळे दिवसेंदिवस रस्त्याची दुरवस्था होत चालली आहे. यासाठी नवनिर्वाचित आमदार राजेश विटेकर यांनी पुढाकार घेऊन राष्ट्रीय महामार्ग ५४८ (ब) चा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी नागरीकांतून केली जात आहे.



**जिंतूर सेलु विधानसभा मतदारसंघात प्राथमिक भाजप सदस्य नोंदणी करताना महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री सौ मेघनाताई बोर्डीकर साकोरे यांनी जिंतूर व सेलू विधानसभा मतदारसंघात जास्तीत जास्त नागरिकांनी भाजप सदस्य नोंदणी करून घ्यावी यासाठी त्या स्वतः लक्ष देत आहेत त्यांच्यासोबत भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष गोविंद भाऊ थिटे भाजपचे अभिजीत भोबे पाटील सचिन आडे व इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने दिसत आहेत.**

## अंगलगाव तांडा येथील शेतकऱ्याने केली आत्महत्या

**जिंतूर,/प्रतिनिधी-** सततच्या नापिकीमुळे तालुक्यातील अंगलगाव तांडा येथील एका ५५ वर्षीय शेतकऱ्याने शेतात गळफास घेऊन आत्महत्याा केल्याची घटना घडली.



ही घटना दि.११जानेवारी शनिवार रोजी सकाळच्या सुमारास उघडकीस आली. नामदेव रामू जाधव वय ५५ वर्षं रा. अंगलगाव तांडा ता. जिंतूर असे गळफास घेऊन आत्महत्याा करणाऱ्या शेतकऱ्याचे नाव आहे. नामदेव जाधव हे अल्पभूधारक शेतकरी असून सततच्या नापिकिमुळे पेरणीवर केलेला खर्चही निघालेला नाही, निघालेल्या मालाला योग्य ते दरही नाही याच चिंतेने निराश होते. आदी कारणांना कंटाळून त्यांनी दि. १० शुक्रवार रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास गुरांसाठी चारा आणतो म्हणून घराबाहेर पडले.

शुक्रवार मध्यरात्रीच्या सुमारास आपल्या स्वतःच्या शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्याा केली. त्यांच्या पाश्चात पती, आई, दोन मुलं, दोन मुली नातवंड असा मोठा परिवार आहे. शवविच्छेदन ग्रामीण रुग्णालय जिंतूर येथे करण्यात आले. या घटनेने गावात हळहळ व्यक्त होत आहे.

## वाचनाची गोडी निर्माण होण्याकरिता उपक्रम राबविणार- जैन

**बोरी,/प्रतिनिधी-** विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी, त्यांनी लिहित व्हावं यासाठी विविध उपक्रम, स्पर्धा, वाचनासाठी मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील साहित्या, वृत्तपत्र तसेच व्याख्यान्याचे वर्षभरात आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती बोरी येथील जैन वाचनालयाचे ग्रंथपाल नेमिनाथ जैन यांनी दिली.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व त्त्रां शिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली विद्यापीठे, महाविद्यालय, व सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम दरवर्षी १ ते १५ जानेवारी या कालावधीत राबविण्याबाबत संदर्भांकित शासन परिपत्राक निर्गमित करण्यात आले आहे. त्यानुसार बुधवार ८ जानेवारी रोजी बोरी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक कन्या शाळेच्या वर्ग पाचवी 'ब' मध्ये कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक पी. बी. राजवन हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून आर. एम. लांडगे, डी.जी. शिंपले, अश्विनकुमार सोनवणे, वाचनालयाचे उपाध्यक्ष पवन ओझा, ग्रंथपाल नेमिनाथ जैन आदींची उपस्थिती होती. वाचन संकल्प महाराष्ट्राचा या वाचन पंधरवडा निमित्त सामूहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा, वाचन संवाद, पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा, ग्रंथ ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करणे व सदर कालावधीत अधिकाधिक विद्यार्थ्यांची सभासद नोंदणी यासारख्या उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत तसेच या व्यतिरिक्त अभिनव उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत निर्देश आहेत.



त्याानुसार जैन वाचनालयाने या शाळेतील इयत्ता पाचवी ब चा वर्ग दत्तक घेतला आहे. या वर्गातील एकूण ४२ विद्यार्थ्यांना वाचनालयाचे नवीन सभासद करण्यात आले. वाचनालयात राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमाची माहिती उपाध्यक्ष पवन ओझा यांनी यावेळी दिली. या उपक्रमासाठी निवड केल्याबद्दल आठवी ब च्या वर्गशिक्षिका पी. ए. पारसेवार यांनी वाचनालयाचे आभार मानले.

CMYK

धाराशिव •
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पोलिस उपनिरीक्षकपदी निवड; माजी आ.सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते सत्कार

**परंडा, दि.११ जानेवारी -**
महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पोलीस उपनिरीक्षक पदावर निवड झालेले परंडा तालुक्यातील सर्वश्री राजकुमार नरूटे (पिठापूरी), विराज गाढवे (देऊळगाव), सुदर्शन पाटील (भोंजा) व सोहन हजारे (परंडा) यांनी मा.आ.सुजितसिंह ठाकूर यांची भेट घेतली. त्यावेळी श्री. ठाकूर यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. हे चौघेही ग्रामीण भागातील सामान्य शेतकरी कुटुंबातील आहेत.





### संक्षिप्त वृत्त...



### इंदिरा प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी मांडला बाल आनंद बाजार

**मंगरुळ, दि.११ जानेवारी -**
विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानाबरोबर व्यावहारिक ज्ञान अवगत व्हावे यासाठी तुळजापूर तालुक्यातील मौजे मंगरुळ येथील इंदिरा माध्य. व उच्च माध्य.विद्यालय यांनी गावातील मुख्य बाजार चौकात बाल आनंद बाजार मांडला या आनंद मेळाव्याचे उद्घाटन गावातील उपस्थित नागरिकांच्या हस्ते करण्यात आले. मंगरुळच्या रहिवाशांनी आपल्याच गावातील विद्यार्थ्यांनी विक्रीसाठी आणलेला माल खरेदी करून त्यांना प्रोत्साहन दिले बाजार आनंद बाजारात जवळपास वीस हजार रुपयांची उलाढाल विद्यार्थ्यांनी केली. बाल आनंद मेळाव्यासाठी मुख्याध्यापक सुदर्शन शिंदे, जब्बार शेख, बालाजी डोंगरे, बंडू डोंबाळे, चव्हाण, बालाजी गुरव, बनसोडे, करपे, माशाळकर, शेख यांच्यासह प्रशालेच्या कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### उपळाई शाळेत बालआनंद मेळावा

**धाराशिव, दि.११ जानेवारी -**
प्राथमिक शाळा उपळाई येथे बाल आनंद मेळावा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी जि.प धाराशिव माध्यमिक विभागाचे विस्तार अधिकारी येरमूनवाड, चिलवडी केंद्रप्रमुख नागले, येरमाळा बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी संतोष माळी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्ता मुंढे सरपंच बापू मुंढे, माजी पं.स.सदस्य राम हारी मुंढे माजी सरपंच विठ्ठल मुंढे सर्व सदस्य, शाळा समिती सदस्य, ग्रामस्थ शिक्षणप्रेमी विद्यार्थी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक येळंबकर यांनी केले.



### अपशिंगे मिलिटरी शाळेत बालबाजार

**जळकोट, दि.११ जानेवारी -**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अपशिंगे मिलिटरी येथे मुलांच्या बालबाजार भरवण्यात आला होता. या बालबाजाराचा उद्देश विद्यार्थ्यांमधील व्यवहार ज्ञान, गणिती क्रियांचे उपयोजन, संभाषण कौशल्यांचा विकास व्हावा, त्यांच्यात सभाधीटपणा वाढावा, त्यांना समाजातील शेतकरी, कामगार वर्ग, छोटे मोठे व्यावसायिक, स्वतःचे आई वडील यांचे कष्ट, मेहनत कळावी, प्रत्येक गोष्टीचे मोल समजावे म्हणून हा बालबाजार आयोजित करण्यात आला होता. प्रासंगिक वस्तूंचे, खेळण्यांचे स्टॉल लावले होते.

## बाल महोत्सवातुन बालकांच्या सुप्त गुणांना वाव : न्यायमुर्ती वसंत यादव



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.११ जानेवारी -**
चाचा नेहरू बाल महोत्सव हे अनाथ, निराधार ,निराश्रीत बालकांसाठी संपन्न होत असुन,त्या बालकांसाठी त्यांचे पालक बनुन त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.हे चाचा नेहरू बाल महोत्सव हे बालकांच्या सुप्त गुणांना वाव देणारे महोत्सव आहे. त्यासाठी बालकांनी मजा,मस्ती करुन आनंदोत्सव साजरा करावा असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव न्यायमुर्ती वसंत यादव यांनी केले.

तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग येथील आपलं घर बालगृह येथे आयोजित केलेल्या महिला व बाल विकास विभाग, जिल्हा व महिला बालविकास अधिकारी कार्यालय यांच्या वतीने १० ते १२ जानेवारी २०२५ या कालावधीत आयोजित केलेल्या जिल्हा स्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षीय भाषणात वसंत यादव बोलत होते.

यावेळी महिला व बालविकास अधिकारी किशोर गोरे, बालकल्याण समितीचे अध्यक्ष विजयकुमार माने, सदस्य दयानंद काळुंके, सदस्या ॲड.दिपाली जहागिरदार, ॲड. मैना भोसले, ॲड.सुजाता माळी, जिल्हा परिविक्षा अधिकारी रेहाना जमादार, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अमोल कोवे, जिल्हा परिविक्षा अधिकारी व्यंकट देवकर, अरविंद थोरात, भुजंग भोसले, ॲड.शशिकांत पाटील, पंढरीनाथ घोडके, क्रिडा परिक्षक, गोरख जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती. या महोत्सवाचे जंगी उद्घाटन आकाशात फुगे सोडून व हिरवा झेंडा दाखवून मोठ्या थाटात करण्यात आले.

# तुळजाभवानी तीर्थक्षेत्र विकास आराखडा मान्यतेसाठी मुख्यमंत्र्यांकडे सादर

**दोन हजार शंभर कोटींचा आहे आराखडा... लवकरच मान्यताही मिळेल; आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ जानेवारी -**
महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्र विकासासाठी राज्य सरकारने एक हजार ३२८ कोटी रुपयांचा निधी छत्रपती संभाजी नगर येथील मंत्रिमंडळ बैठकीत जाहीर केला होता. तो आराखडा आता अंतिम करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार दोन हजार १०० कोटी रुपयांचा परिपूर्ण अंतिम विकास आराखडा राज्य शासनाच्या प्रशासकीय मान्यतेसाठी आज मुख्यमंत्री कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे. आता लवकरच या अंतिम विकास आरखड्यास मंजुरी मिळेल, असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.



तुळजाभवानी देवीचे तीर्थक्षेत्र वैश्विक दर्जाचे करण्यासाठी आपण मागील अनेक वर्षांपासून प्रयत्न करीत आहोत. जगभरातील भाविक तुळजापुरात यावे आणि त्यातून मोठ्या प्रमाणात अर्थकारणाला बळकटी मिळावी, त्यातून हजारोंची रोजगार निर्मिती व्हावी हे त्यामागील उद्देश आहे. संकल्पित आराखड्याचे दि.३१ मार्च २०२३ रोजी जनतेसमोर सादरीकरण करून त्यांच्या हरकती व सूचना मागवल्या होत्या. आपल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर १६ सप्टेंबर २०२३ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील मंत्रिमंडळ बैठकीत एक हजार ३२८ कोटींचा निधी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी महायुती सरकारने मंजूर केला होता. त्यानंतर २८ जुलै २०२४ रोजी परिपूर्ण विकास आराखडा तयार करण्यासाठी संकल्पना स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यासाठी रीतसर निविदाही प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार सहभागी झालेल्या विविध वास्तुविशारद कंपन्यांनी अधिक परिपूर्ण असे सादरीकरण केले. त्यातून गुणवत्तेच्या आधारे निवड करण्यात आलेल्या संकल्पनेचा अंतिम आराखड्यात समावेश करण्यात आला असल्याचे चित्र आ.पाटील यांनी सांगितले. तुळजाभवानी देवीचे क्षेत्र वैश्विक दर्जाचे धार्मिक पर्यटन केंद्र म्हणून विकसित व्हावे यासाठी सर्वसमावेशक प्रक्रियेचा अंगीकार करण्यात आला आहे. २० जून २०२४ रोजी आराखड्याचे पुन्हा एकदा सादरीकरण करण्यात आले. त्यानंतर १५ जुलै २०२४ रोजी आराखड्याची माहिती संस्थानच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली. शहर आणि परिसरातील नागरिकांच्या सूचना व हरकती मागवून घेण्यात आल्या. नागरिकांच्या सूचना, आक्षेप जाणून घेण्यासाठी २० जुलै रोजी शहरवासीयांसोवत बैठक घेतली. आलेल्या सूचनांवर निर्णय घेण्यासाठी अति. जिल्हाधिकारी यांची समिती स्थापन केली. पुजारी, भाविक व शहरवासीयांच्या सूचनांचा अभ्यास करुन योग्य आक्षेप व सूचनांचा आरखड्यात नव्याने अंतर्भाव करण्यात आला. त्यामुळे प्रस्तावित आरखड्याची प्रकल्प किंमत रु.१३२८ कोटींवरून रु.२१०० कोटी एवढी झाली असल्याची आ.पाटील यांनी सांगितले.

### भूसंपादनासाठी प्रचलित दराच्या कैकपट मावेजा

तुळजापूर शहरातील नागरिक आणि पुजारी बांधवांना विश्वासात घेऊन भूसंपादन प्रक्रिया राबवली जाणार आहे. प्रचलित दाराच्या कैकपटीने विकास आराखड्यासाठी जमिनीचे भूसंपादन केले जाणार आहे. त्यासाठी सादर करण्यात आलेल्या या अंतिम विकास आराखड्यात तब्बल ५०० कोटी रुपयांची तरतुद केवळ भूसंपादन प्रक्रियेसाठी करण्यात आली आहे. त्यामुळे ज्यांची जागा तीर्थक्षेत्र तुळजापूरच्या विकासासाठी संपादित केली जाणार आहे त्यांना समाधानकारक मावेजा मिळणार आहे. सर्वांच्या सहमतीने आणि सर्वांना विश्वासात घेऊन, तसेच जमिनीचा चांगला मोबदला देऊन आई तुळजाभवानी देवीचे तीर्थक्षेत्र जागतिक दर्जाचे करण्याचा आपला प्रयत्न असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

### दर्शन मंडपात विविध सुविधा

तीर्थक्षेत्र विकास आराखड्यामध्ये मुख्य दर्शन मंडप व तेथील अनुषंगिक सुविधा, घाटशिळ व हडको येथे भाविक सुविधा केंद्र, शहरात व शहराच्या प्रमुख रस्त्यावरील प्रवेशद्वारावर आकर्षक कमान, वृंदावन गार्डनप्रमाणे आधुनिक उद्यान, वृध्द व दिव्यांगाकरिता लिफ्ट, ट्रॅव्हलेटर आदी बाबींचा अंतर्भाव करण्यात आला आहे. तसेच विकासकामांसाठी आवश्यक भूसंपादनाकरिता देखील निधीची तरतूद ठेवण्यात आली आहे. भूसंपादन व शासकीय करापोटी आवश्यक असणारे शुल्क तसेच विकासकामांसाठी लागणारा निधी असा एकूण दोन हजार शंभर कोटी रुपयांचा अंतिम आराखडा प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

## उद्योजकता एस समिट २०२५ : उद्योजक, महिलांनी सहभाग नोंदविण्याचे ॲड.आकांक्षा चौगुले यांचे आवाहन

**उमरगा, दि.११ जानेवारी -**
ज्ञानज्योती बहुउद्देशीय सामाजिक संस्था, उमरगा, ग्रामऊर्जा फाउंडेशन, अंबाजोगाई, युथएड फाउंडेशन, पुणे यांच्या विद्यमाने जिल्ह्यात प्रथमच उमरगा येथे उद्योजकता एस समिट-२०२५, मकर संक्रातीनिमीत्त महिलांसाठी भव्य प्रदर्शन व विक्री मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. १२ डिसेंबरपर्यंत हा कार्यक्रम श्रीराम मंगल कार्यालय, उमरगा येथे संपन्न होणार आहे. उद्योजकांना आपली उद्योग विषयक कल्पना सादर करण्यासाठी व्यासपीठ, गुंतवणूकदार, मार्गदर्शक आणि प्रमुख व्यक्तीशी ओळख, राष्ट्रीय एस समिट बेंगलोर येथे जाण्याची संधी, आपल्या उद्योगासाठी पैसे/भांडवल मिळविण्याची संधी उपलब्ध होणार आहेत. स्पर्धेतील विजेत्यास विजेते प्रमाणपत्र, उद्योजक प्रशिक्षण संदर्भात ७ दिवसीय बुटकॅम्प, व्यवसाय विकासासाठी लागणारे मार्गदर्शन, राष्ट्रीय एस समिट मध्ये थेट प्रवेश, जिल्हास्तरीय व्यवसायिक मार्गदर्शकांशी ओळख आदी लाभ मिळणार असून सहभागी होण्याचे आवाहन ॲड.आकांक्षा चौगुले यांनी केले आहे.

## लवकर न्याय मिळावा; देशमुख कुंटूंबियांची निवेदनाद्वारे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ जानेवारी -**
मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख व परभणी येथील सोमनाथ सोमवंशी प्रकरणी शनिवारी धाराशिव शहरात सर्वपक्षीय जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी देशमुख यांनी लवकर न्याय मिळावा आणि या प्रकरणातील आरोपींना मदत करणाऱ्यांना सहआरोपी करावे, अशी मागणी केली.



या जन आक्रोश मोर्चात मोठ्या संख्येने धाराशिवसह बीड जिल्ह्यातील नागरिक सहभागी झाले होते. संतोष देशमुख व सोमनाथ सोमवंशी यांच्या कुटुंबियांनीही या मोर्चात सहभाग घेतला.

मराठा आरक्षणाच्या आंदोलनासाठी लढा देणारे मनोज जरांगे यांनी मंत्री धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप करत त्यांच्यावर एकेरी भाषेत टीकास्त्र सोडले आहे. ते म्हणाले, धनंजय मुंडे आपल्या गुंडांच्या टोळीच्या माध्यमातून ओबीसीचे पांघरूण घेण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे मराठा समाजाने सावध होण्याची गरज आहे. मुंडेंनी गुंडांचा माज थांबवावा आणि समाजाविरोधात ओबीसींना उभे करण्याचा प्रयत्न केला, तर त्याचे परिणाम भोगावे लागतील. जरांगेंनी मुंडेंचा उल्लेख धन्या मुंडे असा करत त्यांच्या वर्तनावर जोरदार हल्ला चढवला. पण ज्या दिवशी या लोकांनी धनंजय देशमुख यांना धमक्या दिल्या, त्याच दिवशी मुंडेंच्या विरोधात उभा राहिलो. एकदा पाठ सोडत नाही, हे माझे धोरण आहे, असे जरांगे म्हणाले.

## श्री क्षेत्र तुळजापुरात पाचव्या माळेनिमित्त हजारो भाविकांनी घेतले आई तुळजाभवानी देवीचे दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.११ जानेवारी -**
कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या शाकंभरी नवरात्र उत्सवानिमित्त आज दि.११ जानेवारी शनिवार रोजी पाचव्या माळे निमित्त देवीला पारंपारीक शिवकालीन दागदागिन्यांचा साज सजवण्यात आला त्यानंतर देवीस भवानी तलवार अलंकार महापूजा मांडण्यात आली, तत्पूर्वी जलयात्रा दुपारी बारा वाजता मंदिरामध्ये आल्यानंतर पापनास तीर्थ येथून सुहासिनी कुमारी का आणि महिलांनी कलश आंब्यांची पाने व त्यावर श्रीफळ ठेवून तो कलश आपल्या मस्तकी घेऊन आलेल्या पवित्र जलाने तुळजाभवानी देवीच्या गाभाऱ्यापासून ते भवानी शंकर पर्यंत संपूर्ण मंदिर धुवून घेतले. तुळजाभवानी देवींच्या अभिषेकास



सुरुवात झाली. जलयात्रेमुळे उशिरा चालू झालेल्या अभिषेक साधारण तीन वाजेपर्यंत चालू होते. अभिषेक आणि नित्योपचार पूजा आरती झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांची चांदीची मुर्ती भवानी तलवार स्वीकारतानाचे ऐतिहासिक क्षण येथे आकर्षक रूपात साकारले होते. देवीचे भवानी तलवार रूपातील दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती

यावेळी देवीला फिकट गुलाबी रंगाचा कलाकुसर बुट्टेदार शालू नेसविण्यात आला होता. शिवाजी महाराज यांच्या काळातील महाराजांनी तुळजाभवानी देवीस अर्पण केलेले दागिने यांमध्ये हिरे, मोती, पांचु, रत्नजडीत अलंकार असलेले दागिने घालून भवानी तलवार अलंकार महापूजा मांडण्यात आली होती. छत्रपती शिवाजी महाराज यांना आई तुळजाभवानी मातेनी प्रसन्न होऊन धर्मरक्षणासाठी आणि स्वराज्य स्थापनेसाठी भवानी तलवार देवून आशिर्वाद दिला होता. देवीसमोर छत्रपती शिवाजी महाराजाची चांदीची प्रतिमा ठेवली जाते व भवानी तलवार अलंकार महापूजा अशा स्वरुपात महापुजा मांडतात. तत्पूर्वी शुक्रवारी चौथ्या माळेला सायंकाळी अभिषेकाची घाट झाल्यानंतर देवीचे यथासांग नित्य अभिषेक पूजाविधी पार पडले.त्यानंतर धुपारती होऊन अंगारा काढण्यात आला.प्रक्षाळ पूजेदरम्यान मंदीरातील गाभारा पाण्याने धुण्यात आला. प्रक्षाळ मंडळाच्या सर्व देवीभक्तांनी गाभारा धुऊन प्रक्षाळपूजा संपन्न केली.रात्री देवीची प्रक्षाळपूजा करण्यात येऊन देवीला पानाचे घर लावण्यात आले. सायंकाळच्या पूजेस देवीला फुलांचा मुकुट आणि पानाचे घर घातल्याने देवीचे सुंदर आणि आकर्षक रूप दिसून येते. प्रक्षाळ पूजा चालू असताना मंदिर परिसरात देवीचा छबिना सिंह वाहनावरून काढण्यात आला. देवीच्या छबिण्यासाठी भाविक भक्त, पुजारी, महंत मंदिर कर्मचारी, अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### उंडरगाव येथील शाळेत बाल आनंद मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ जानेवारी -**
तालुक्यातील उंडरगाव येथील जि.प. प्राथमिक शाळेत कौशल्य विकासअंतर्गत बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रंगनाथ जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. युवराज तोडकरी व भरत गंगणे यांच्या कडून प्रत्येकी २५० रुपये पारितोषिक देण्यात आले. या मेळाव्यात तब्बल २५००० हजाराची उलाढाल होऊन मुलांनी १३००० हजार रुपयांचा नफा मुलांनी मिळवला तसेच यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून केंद्र प्रमुख विश्वजीत चंदनशिवे तर व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष बालाजी माने, शाळेचे मुख्याध्यापक राजकुमार माळवदकर, शाळेतील शिक्षक, इस्माईल तांबोळी, आशिफा सय्यद, जयश्री वाघमारे, विकास घोडके, पोलीस पाटील नीलकंठ कोठावळे, ज्ञानेश्वर गंगणे, श्रीकृष्ण गंगणे, युवराज तोडकरी, प्रदीप ढोबळे, विश्वास ढोबळे, गावचे उपसरपंच हिराचंद मोरे, हरी पवार, नेताजी सूर्यवंशी, बालाजी सूर्यवंशी यांच्यासह गावातील महिला पालक सर्व शिक्षण प्रेमी नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

# सौर, पवन ऊर्जा प्रकल्प उभारणी प्रक्रियेत येणार पारदर्शकता

**राज्य सरकारला सादर करणार कार्यपणाली प्रारूप : आ.राणाजगजितसिंह पाटील**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ जानेवारी -**



जिल्ह्यातील एकूण भौगोलिक परिस्थिती सौर आणि पवन उर्जा निर्मितीसाठी पूरक आहे. त्यामुळे या परिसरात सैर ऊर्जा आणि पवन ऊर्जा प्रकल्पांना मोठा वाव आहे. त्यामुळेच अनेक प्रतिथयश कंपन्यांकडून या परिसरात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली जात आहे. ऊर्जा निर्मिती प्रकल्पासाठी जमिन विकत अथवा भाडे तत्वावर घेतली जात असताना शेतकऱ्यांना योग्य व समाधानकारक मोबदला मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी अवलंबिण्यात येणाऱ्या कार्यपद्धतीत पारदर्शकता आणण्यासाठी आपण कार्यप्रणाली बाबत एक प्रारूप तयार करून शासनाला पाठविणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या समवेत झालेल्या चर्चेनुसार धाराशिव जिल्ह्यात प्रथमतः पवन व सौर ऊर्जा प्रकल्पासंबंधित जमीन व्यवहार व कार्यपद्धतीत पारदर्शकता आणण्यासाठी सुयोग्य कार्यप्रणालीचा प्रारूप आराखडा तयार करण्याचे ठरले आहे. त्या अनुषंगाने आपण केलेल्या सूचनेनुसार शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती.


या बैठकीस जिल्हाधिकारी सचिन ओंबासे यांच्यासह जिल्हा पोलिस अधिक्षक, संजय जाधव, अपर पोलिस अधिक्षक गौहर हसन आणि जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, उपविभागीय पोलिस अधिकारी, महाराष्ट्र उर्जा विकास प्राधिकारणाचे अधिकारी व पवन उर्जा कंपनीचे प्रतिनिधीही उपस्थित होते. विकास प्रकल्प राबविताना शेतकऱ्यांच्या व्यापक हिताला प्राधान्य ही आपली कार्यपद्धती आहे. शेतकरी बांधवांचे हित जोपासणे ही प्रशासनाची प्राथमिकता असायला हवी. जिल्ह्यात पवन उर्जा प्रकल्पासाठी जमीन खरेदी व भाडे करार तसेच रस्त्याच्या अनुषंगाने झालेल्या व्यवहारातील अनियमितता व गैरप्रकार रोखण्यासाठी एक सुयोग्य पारदर्शक कार्यपद्धती निश्चित करणे आता आवश्यक झाले आहे. त्यामुळे या बैठकीत त्यावर सविस्तर चर्चा करून कार्यप्रणालीचे प्रारूप तयार करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांना देण्यात आल्या आहेत. सदरील प्रारूप शासनाकडे सादर करण्यात येणार असून त्याद्वारे अंतिम कार्यपद्धती निश्चित केली जाणार आहे.

जमीनमालक, प्रकल्पधारक व शासनाचे विविध विभाग यांच्यामध्ये समन्वय ठेवून शेतकऱ्यांना न्याय व गुंतवणूकदारांना प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक त्या सर्व बाबींचा यामध्ये समावेश करण्याचे आपण सूचित केले असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे. जिल्ह्यात जवळपास ३०० दिवस स्वच्छ सूर्यप्रकाश व ऊर्जा निर्मिती प्रकल्पास पूरक वातावरण आहे. त्यामुळे सौर उर्जा व पवन उर्जा प्रकल्प धाराशिव जिल्हा आणि परिसरात येत आहेत. पुढील काळात आणखीन मोठ्या प्रमाणात प्रकल्प येणार आहेत. त्यामुळे एकूण कार्यपद्धतीत पारदर्शकता असणे अत्यावश्यक आहे. ती आणण्यासाठी व शेतकऱ्यांच्या हिताचे पूर्ण रक्षण करण्यासाठी सुयोग्य कार्यप्रणालीचा अहवाल तयार करून पुढील आठवड्यात शासनाकडे सादर करण्यात येणार असल्याचेही आमदार पाटील यांनी सांगितले.

# माळटेकडी पुलाच्या खाली युवकाचा खून

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ११ जानेवारी**

शहरातील माळटेकडी पुलाच्याखाली एका खुन झाल्याची घटना आज दिनांक ११ जानेवारी रोजी उघडकीस आली. या प्रकरणी मयताच्या भावाने दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपी विरूद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



शहरातील माळटेकडी म्हाळजा येथील शेख सिद्दीक शेख सादीक व त्याचे कुटुंबीय दि. १० जानेवारी रोजी एका नातेवाईकाच्या कार्यक्रमासाठी मिर्झा फंक्शन हॉल येथे गेले होते. रात्री ८.३० च्या सुमारास ते घरी परतले परंतू शेख सिद्दीक हा उशीरा येणार असल्याचे सांगून तिथेच थांबला. दरम्यान दि.११ जानेवारी रोजी शेख सिद्दीक याचा मृतदेह माळटेकडी पुलाच्या खाली आढळून आला. मयत शेख सिद्दीक याच्या छातीवर तिक्ष्ण हत्याराने वार केल्याचे आढळून आले. फंक्शन हॉल येथून परत येत असताना अज्ञात आरोपीने त्याचा खुन केला अंदाज वर्तविण्यात येत आहे. या प्रकरणी शेख अमीर शेख सादीक यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विमानतळ पोलीस ठाण्यात खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**माळटेकडी पुल परिसर बनला गुन्हेगारांचा अड्डा**

दरम्यान माळटेकडी पुल व परिसर गुन्हेगारांचा अड्डा बनत चालला आहे. यापुर्वीही पादचाऱ्यांना तसेच वाहन धारकांना लुटण्याच्या घटना देखील घडल्या आहेत. याच ठिकाणी अनेक गुन्हेगार बसून दारू रिचवतात तर अंधाराचा फायदा घेत नागरीकांना लुबाडण्यात येते. अशा अनेक घटना घडत असताना विमानतळ पोलीस मात्र यावर कुठलाच प्रतिबंध घालत नसल्याचे दिसून येत आहे.

# आ. कोहळीकर यांच्या उपस्थितीत सलग ७ तास चालली पाणीटंचाईची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. ११ जानेवारी**

हदगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेस आगामी उन्हाळ्यात पाणी टंचाईची कमतरता भासू नये तसेच पाण्याअभावी एकाही कुटुंबाचे स्थलांतर होता कामा नये तसेच इतर कोणत्याही कार्यालयातील जनतेचे काम वेळेत पूर्ण व्हावे अश्या कडक शब्दात प्रशासनास खडे बोल सुनावत पंचायत समिती अंतर्गत आयोजित केलेल्या पाणीटंचाई, आम सभा व जनता दरबारच्या आढावा बैठकीत प्रतिपादन आ. कोहळीकर यांनी केले असून तब्बल ७ तास चाललेल्या या बैठकीत आमदार



पदी निवड होताच पहिल्यांदाच जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासनाला कडक सूचना, आदेश देत आपल्या कार्याची चूक पहिल्याच सभेत दाखवून दिल्याची चर्चा नागरिकांमधून होत आहे.

पंचायत समिती कार्यालय अंतर्गत पाणीटंचाई आढावा, आमसभा व जनता दरबारच्या बैठकीच्या आयोजन आ. कोहळीकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली असून आ. कोहळीकर यांनी तालुक्यातील प्रत्येक गावातील ग्रामसेवकाकडून सद्यस्थितीत व पुढील फेब्रुवारी ते मार्च महिन्यात पाणीटंचाईचा प्रश्न उद्भवू नये यासाठी काय करावे लागेल याची सविस्तर माहिती घेतली तसेच याही व्यतिरिक्त आणखीन काही मागणी असतील तर ते सुद्धा जाणून घेतल्या. आगामी उन्हाळ्यात नागरिकांना पाण्याची टंचाई भासू नये यासाठी प्रशासनाने सुद्धा तत्पर असले पाहिजे तसेच काही अडचण असल्यास तात्काळ सांगावे जेणेकरून मी माझ्या परीने ती अडचण दूर करत नागरिकांना पाण्याची टंचाईचे चटके बसता कामा नये.

यावेळी अनुपस्थिती असलेल्या विविध विभागातील कर्मचाऱ्यांची चांगलीच खरडपट्टी आ. कोहळीकर यांनी काढली यावेळेस ही पहिलीच बैठक असल्याने सध्या तरी कोणतेही क्शन आता घेणार नाही मात्र पुढच्या बैठकीच्या वेळेस माफी भेटणार नाही अशा कडक शब्दात अधिकाऱ्यांना खडे बोल सुनावले.

यावेळी व्यासपीठावर माजी खा. सुभाष वानखेडे, जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, तहसीलदार , गट विकास अधिकारी, अनिल पा. बाभळीकर, बाळासाहेब कदम, गोपाल सारडा, संदेश पा. हडसणीकर, आबा वानखेडे, बबनराव कदम, मंचक कदम यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी ,तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, कृषी विभाग इतर कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, सरपंच यांच्यासह पत्रकार बांधव महिलावर्ग व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या तालुका सचिवपदी दिलीप पोतरे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. ११ जानेवारी**



मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ७ वे तालुका अधिवेशन पक्ष कार्यालय भोकर येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनी मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

या अधिवेशनास किसान सभेचे केंद्रीय कमीटीचे सदस्य तथा पक्षाचे भोकर प्रभारी कॉ. अर्जून आडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कामगार नेते तथा सिटूचे जिल्हा कमिटी सदस्य कॉ. दिलीप पोतरे यांची सर्वानुमते एकमताने माकपा भोकर तालुका सचिव पदी निवड या अधिवेशनात करण्यात आली. कॉ. अर्जून आडे यांनी अधिवेशनास उपस्थित प्रतिनिधीनां सविस्तर मार्गदर्शन केले तर पक्षाचे मावळते तालूका सचिव तथा जिल्हा कमीटी सदस्य कॉ. शिवाजी गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. सदरील अधिवेशनात तालुका कमिटी सदस्य म्हणून कॉ. शिवाजी गायकवाड कॉ. दिलीप पोतरे कॉ. अनिल कराळे कॉ. भिमराव जाधव कॉ. लक्ष्मण राव आदींची निवड करण्यात आली.

## पद्मशाली समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी कटीबद्ध: आ. केराम

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ११ जानेवारी**

किनवट माहूर मतदारसंघातील पद्मशाली समाज नेहमीच माझ्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला आहे या समाजाचे माझ्या नेतृत्वाप्रती असलेले प्रेम मी कदापिही विसरणार नाही. पद्मशाली समाजाचे प्रश्न आणि त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मी सदैव कटिबद्ध राहील असे मत आमदार भीमराव केराम यांनी व्यक्त केले आहे.

दुसऱ्यांदा आमदार झाल्याबद्दल पद्मशाली समाज संघटना किनवट च्या वतीने ११ जानेवारी रोजी मार्कंडेय मंदिरात आमदार भीमराव केराम यांचा नागरी सत्कार व ऋणनिर्देश सोहळा आयोजित केला होता त्याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पद्मशाली समाज संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रकाश दासरवार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पद्मशाली समाज संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रीधर सुंकरवार,राज्य अध्यक्ष प्रल्हाद सुरकुटवार लक्ष्मीकांत गोणे, भाजप नेते सुधाकर भोयर, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार,अशोक नेम्मानीवार,अनिल तीरमनवार, बाबुराव केंद्रे, संदीप केंद्रे, दत्ता आडे, श्रीनिवास नेम्मानीवार, पाळवदे सर, श्रीनिवास सातुरवार,चंद्रकांत नेम्मानीवार,विठ्ठलराव मच्छरलावार,रमेश दारमवार, पत्रकार प्रदीप वाकोडीकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

पुढे बोलताना आ. केराम म्हणाले की पद्मशाली हा समाज किनवट माहूर तालुक्यात संख्येने कमी असला तरी कायम माझ्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला आहे. माझ्या कार्यावर व नेतृत्वावर विश्वास ठेवून या समाजाने मला निवडणुकीत आशीर्वाद दिले. त्यांचे हे प्रेम व जिव्हाळा मी विसरनार नाही. आमदार या नात्याने पद्मशाली समाजाचे प्रश्न आणि समस्या सोडविण्यासाठी मी सदैव तत्पर राहीन असे ते म्हणाले.

यावेळी पद्मशाली समाजाकडून आमदार भीमराव केराम यांना शाल श्रीफळ देऊन तसेच भव्यपुष्पहार घालून नागरि सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमास पद्मशाली समाज संघटनेचे विनोद सुंकरवार, प्रा.विजय उपलेंचवार,नागभूषण येब्बरवार, संतोष कुंकलवार, ईस्तारी पत्तीवार, संतोष ताडेवार, सुनील मच्छेवार, शिवा क्यातमवार, किरण कस्तुरवार, मनोज म्याकलवार, मारोती मुलकेवार, मार्कंडेय सिरमवार, मार्कंडेय अंगारवार, नरसिंग क्यातमवार, आशिष ताडेवार, सुरेश आलचेट्टीवार, प्रभाकर दासरवार, राजु ताटीकुंडलवार, गणेश कत्तूलवार, संजय ताटीकुंडलवार, विद्या पेरालावार आदी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### विद्यापीठाचे प्रा. तौर यांना राष्ट्रपतींकडून प्रजासत्ताक दिनासाठी विशेष निमंत्रण

**नवीन नांदेड**-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील भाषा वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुलातील मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर यांना महामहिम राष्ट्रपती यांच्या कडून दिल्ली येथील २६ जानेवारी च्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाला विशेष निमंत्रित करण्यात आले आहे. नांदेड च्या पोस्ट (डाक) विभागाने त्यांना हे निमंत्रण पत्र वैयक्तिक आणून दिले. हे निमंत्रन माझ्यासाठी आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व मराठी भाषेवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकासाठी अभिमानास्पद असून नुकताच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. त्या पार्श्वभूमीवर हे निमंत्रण आमच्या साठी मोठी उपलब्धी असल्याची भावोत्कट प्रतिक्रिया प्रा. डॉ. तौर यांनी व्यक्त केली. डॉ. पृथ्वीराज तौर हे मराठी भाषेचे अभ्यासक, लेखक आहेत. त्याचबरोबर त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर सहभाग घेतला आहे. साहीत्य क्षेत्रातील अनेक पुरस्कार त्यांना मिळाले असून ३० (तीस) पेक्षा अधिक ग्रंथ, कविता संग्रह अशी लेखन संपदा आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर डॉ. तौर यांना भारतीय लेखक म्हणून इजिप्तची राजधानी कैरो येथे आयोजित साहित्य महोत्सवात आमंत्रित करण्यात आले होते. तसेच चीनमध्ये आयोजित ब्रिक्स देशातील लेखकांच्या संमेलनात त्यांनी मराठी भाषेचे प्रतिनिधित्व केले. ऑक्टोबर २०२४ मध्ये अंताल्या, तुर्की येथे आयोजित जागतिक बालसाहित्य परिषदेत त्यांनी बीजभाषण केले.


### पांडूरंग रहाटकर यांचा षटकोनी मित्रमंडळाच्या वतीने सत्कार



**लोहा**-तालुक्यातील जनतेला दैनिक वृत्तपत्रांच्या माध्यमातून अनेक वर्षे हा व्यवसाय करणारे बाबु सावकार रहाटकर यांच्या कडुन यांचे जेष्ठ चिरंजीव पांडुरंग राहाटकर यांनी पंरपरा जपुन वाचन संस्कृती रुजविण्याचे काम वर्तमानपत्रे व अनेक धार्मिक ग्रंथ व शैक्षणिक पुस्तके विकणारे राहाटकर कुटुंबातील स्व.अंनतराव नागापूरकर उत्कृष्ट वृत्तविकृत्ता पुरस्कार प्रधान केला या पुरस्काराबदल षट्कोन मित्रमंडळानी सत्कार केला. यावेळी खरेदी विक्री संघाचे संचालक भिमराव पाटील शिंदे,माजी नगरसेवक उत्तम महाबळे,तुकाराम दाढेल, गोविंद वड,केतन खिल्लारे, फिरोज मणियार,रेश्माजी दांगटे,सगर, दाढेल,कापुरे,मारोती कांबळे आदी मित्रमंडळाची उपस्थित होती.शहरात नव्याने षटकोनी मत्रमंडळाची स्थापना झाल्याने सामाजिक व राजकिय वर्तुळात चर्चाला उदान आले आहे.

### बोरवाडीच्या भूमिपुत्राला राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कार जाहीर

**नांदेड**-भोकर तालुक्यातील मौजे बोरवाडीचे भूमिपुत्र गंगाधर यशवंतराव वानोळे हे नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. गावाच्या



सर्वांगीण विकासासह तालुक्यातही समन्वयकाची भूमिका निभावत शैक्षणिक कार्याबरोबरच सामाजिक कार्यातही गेली १७ वर्षे सक्रिय असल्याने त्यांना मराठवाड्यातील मातृभूमी प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झालेला असून आज १२ जानेवारी रोजी बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे प्रतिष्ठित मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. बंजारा आणि आदिवासी बहुल गारगोटवाडीला 'माझा गाव सुंदर गाव' योजनेत सहभागी करून ग्रामीण विकासात पुढे नेणे असो की संपूर्ण आदिवासी समाज बोरवाडीची 'डॉक्टरांचे गाव' म्हणून ओळख निर्माण करणे असो, भोकर येथे आदिवासी वस्तीगृह बांधकाम असो की जिल्हा परिषद,आश्रम शाळेची गुणवत्ता वाढ असो. अशा शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असतात. आदिवासी समाज शिष्टमंडळाच्या माध्यमातून समाजातील विविध समस्या शासन प्रशासन स्तरावर मांडून समन्वयक या नात्याने त्याचा निपटारा करण्यातही वानोळे नेहमी कार्यशील असतात. सामाजिक विषयावर त्यांचे अनेक लेख प्रकाशित झालेले आहेत. यापूर्वीही त्यांना शैक्षणिक व सामाजिक योगदानाबद्दल महात्मा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार, राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार व आदिवासी सेवक पुरस्कार देऊन गौरविण्यात आलेले आहे.

### युवा प्रशिक्षणार्थी विद्यावेतनाच्या प्रतिक्षेत

**नांदेड**-मुख्यमंत्री योजने अंतर्गत येथील राज्य परिवहन महामंडाळाच्या नांदेड आगारात युवा प्रशिक्षणार्थी म्हणून रुजू झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांना मागील तिन महिन्यापासून विद्यावेतन मिळाले नाही. विद्यावेतन तातडीने मिळवून द्यावे अशी मागणी युवा प्रशिक्षणार्थ्यांनी एका निवेदनाव्दारे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. माहे ऑक्टोंबर ते डिसेंबर २०२४ या कालावधीत या प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन मिळाले नसल्याने ते अडचणीत सापडले आहेत. आर्थिक परिस्थिती बिकट त्यातच हे प्रशिक्षणार्थी दुरवरून ॲटोरिक्षाने ये-जा करतात. त्यामुळे त्यांचा दररोजचा खर्च ५० ते १०० रुपये असून हा खर्च देखील त्यांना इतरांकडून उसनवार करावा लागत असून, शासनाने तातडीने विद्यावेतन अदा करावे अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाव्दारे केली आहे.

## गजानननगर येथे महिला-पुरुष बचतगट

**नांदेड**-महिला व पुरुषांच्या घरगुती व किरकोळ गरजांसाठी अनेकदा सावकारा कडून कर्ज घ्यावे लागते त्याला पर्याय म्हणून गजानन नगर येथे गंगाधर निवृत्ती घुले व सुरेश राठोड यांच्या संकल्पनेतून महिला व पुरुष बचत गट स्थापन करून एक अनोखा उपक्रम सुरू केला आहे. या माध्यमातून बचत गटातील सदस्यांना छोट्या रकमांची कर्ज वाटप करण्यात येणार आहेत.

## शास्त्री महाविद्यालयात हिवाळी पदवी परीक्षा सुरळीत

**तभा वृत्तसेवा**
**धर्माबाद,दि. ११ जानेवारी**

येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाअंतर्गत घेण्यात येणारी हिवाळी पदवी परीक्षा महाविद्यालयाचे प्रा.डॉ.कमलाकर कनसे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरळीत पार पडत आहे.

विद्यापीठाच्या वतीने दि.२६ नोव्हेंबर पासुन घेण्यात येणारी हिवाळी परीक्षा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कमलाकर कनसे यांच्या मार्गदर्शनाखाली व परीक्षा विभागप्रमुख डॉ. सुनीलचंद्र सोनकांबळे, सहाय्यक परीक्षा विभागप्रमुख प्रा. रामराव शेवलीकर यांच्या निरीक्षणाखाली कॉपीमुक्त सीसीटीव्हीच्या नजरेत सुरळीत पार पडत आहेत. परीक्षा सुरळीतपणे पार पडण्यासाठी मारुती डेबेकर, व्यंकटेश पालकृतवार, माधव मिरदोडे, राजेश गोविंदलवार, नारायण आडेराव, श्रीनिवास गोरजे, राजेश कोत्तावार बालाजी गंठोड इत्यादीचे सहकार्य लाभत आहे.

## जि. प. प्राथमिक शाळेसमोर गतीरोधक टाकण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ११ जानेवारी**

शहरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसमोर गतिरोधक टाकण्यात यावे यासाठी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांचे मुख्याधिकारी यांना निवेदन. मुख्य रस्ता झाल्यामुळे वाहणानांची राहादारी वाढली आहे त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून नगरपरिषदेने जिल्हा परिषद शाळेसमोर लवकरात लवकर गतिरोधक टाकण्यात यावे अशी मागणी काँग्रेस पक्षाने निवेदनाद्वारे केली आहे. शहरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळे समोरिल रस्त्यावर वाहणांच्या रहदारीत मोठी वाढ झालेली आहे या रस्त्यावरून दोन चाकी, तीन चाकी आणि चार चाकी वाहने वेगाने धावत असतात त्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही शाळा सुटल्यानंतर गेटमधून विद्यार्थी धावत बाहेर पडतात त्यामुळे अपघात होऊ शकते अपघात टाळण्यासाठी शाळेसमोर गतिरोधक टाकून अपघात टाळावे यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने निवेदन देण्यात आले. यावेळी कैलास गोडसे, गिरीष कोत्तावार , मुजीब पठाण,सूर्यकांत चौदंते, अतिक अहेमद, राधेश्याम ढगे, संतोष चमकुरे, अविनाश चौदंते , राजरत्न क्षीरसागर, या कार्यकर्त्यांसह आदींची निवेदनात स्वाक्षऱ्या आहेत.

## लोहा शहरात भाजप सदस्य नोंदणीला प्रचंड प्रतिसाद : सुर्यवंशी

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ११ जानेवारी**

शहरात भाजप सदस्य नोंदणीला सुरुवात केली आहे. 'एक है तो सेफ है' चा नारा देत सदस्य नोंदणीला प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे असे माजी लोकायुक्त नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांनी प्रतिपादन केले.

शहरात भाजपा सदस्य नोंदणी अभियान मोठ्या उत्साहात सुरू झाले आहे . देऊळ गल्ली येथून भारतीय जनता पार्टीने सदस्य नोंदणी अभियानाला प्रारंभ केला असुन भाजपा सदस्य नोंदणी अभियानाचे उद्घाटक गजानन सुर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी माजी नगरसेवक बबनराव निर्मले, माजी.नगरसेवक संदीप दमकोंडवार, अमोल व्यवहारे,युवराज वाघमारे, नगरसेवक नबी शेख, वैभव हाके, सचिन सुर्यवंशी, यशपाल निर्मले, बालाजी आईनवाडीकर, संजय चव्हाण, हनुमंत



लांडगे,लक्ष्मी फुलवरे,पिनू चुडावकर,संजय रहाटकर,दिलीप रहाटकर,विनय चंदलवाड,रेश्माजी दांगटे, संतोष मुंडे,गुलाम नबी, बाळू चुडावकर, शाहरुख शेख,सारंग बुजुर्गे, यांच्यासह कार्यकर्ते, लाडक्या बहिणी उपस्थित होत्या. यावेळी भाजपा सदस्य नोंदणी अभियानास प्रचंड मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला असुन अनेक महिला, पुरूष, युवकांनी सदरील भाजपा सदस्य नोंदणी अभियानात सहभाग नोंदविला.भाजपाचे सदस्य होण्याकरिता ८८०००२०२४ या क्रमांकावर आपल्या मोबाईलवरुन मिस्ड कॉल देऊन सदस्य नोंदनी करुन घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# बोंडगव्हाण आणि पडसा येथे वाळू चोरी करणारे दोन ट्रॅक्टर पकडले

## तहसीलदार यादव यांच्या मार्गदर्शनात नायब तहसिलदार जेठे यांची मध्यरात्री धडक कारवाई; आतापर्यंत ३२वाहने जप्त

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. ११ जानेवारी**

जिल्हाधिकारी अभिजीत राऊत व सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली तसेच तहसीलदार किशोर यादव यांचे मार्गदर्शनाखाली महसूल विभागात अवैध धंदे विरोधात महाकाल म्हणून फेमस असलेले अवैध गौण खनिज उत्खनन,चोरी व वाहतूक करणाऱ्यांचा कर्दनकाळ ठरत असलेले नायब तहसीलदार कैलास जेठे यांची वाळू तस्करांविरोधात धडक मोहीम सुरच असून, त्यांनी दि.१० जानेवारी रोजी मध्यरात्री माहूर तालुक्यातील मौजे बोंडगव्हाण व पडसा येथून वाळू चोरी करणारे दोन ट्रॅक्टर पकडून तहसील कार्यालयात जमा केल्याची आणखी एक जबरदस्त यशस्वी कारवाई केली आहे. वाळू तस्कर महाकालच्या धसक्याने अंधार रात्रीचा फायदा घेत वाहनांचे लाईट बंद करून वाळू चोरी करत असल्याचा सुगावा लागताच महाकाल उर्फ नायब तहसीलदार कैलास जेठे हे एखाद्या टीव्ही चॅनलवरील अवैध धंद्यावरील



शोध मालिका अथवा शोध चित्रपटातील नायकाप्रमाणे विविध प्रकारचे वेषांतर करून जायमोक्यावर पोहचत यशस्वी कारवाया करत असल्याने आतापर्यंत वाळूतस्करांची तब्बल ३२ वाहने जप्त करण्यात आलेली आहेत.

तालुक्यातील विविध ठिकाणी वाळू तस्करांची याआधी ३० वाहने जप्त करून तहसीलदार किशोर यादव, नायब तहसीलदार तथा महाकाल कैलास जेठे, नायब तहसीलदार डॉ. राजकुमार राठोड यांनी गौण खनिज उत्खनन व चोरी करून वाहतूक करणाऱ्या चोरट्यांमध्ये कमालीचा जरब निर्माण केला असतानाच दि.१० रोजी मध्यरात्री छुप्या पद्धतीने तसेच लाईट बंद करून विना नंबरच्या वाहनाद्वारे दोन वाळू चोरी करणारी वाहने पकडल्याने वाळू तस्करात जबरदस्त दहशत निर्माण झाली असून, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी तहसीलदारांना अग्नीशस्त्र दिल्यास वेळ प्रसंगी वाळू तस्करांना गोळ्या घालण्यासही मागे पुढे पाहणार नसल्याचा गंभीर इशारा त्यांनी याआधीच दिला आहे. तरीही निर्ढावलेले काही तस्कर नदीपात्रातून विना नंबरच्या वाहनांचे लाईट बंद करून वाळू चोरी करत असल्याची माहिती मिळाल्याने महाकाल उर्फ नायब तहसीलदार कैलास जेठे यांनी वेशांतर करून मौजे बोंडगव्हाण आणि पडसा येथून चोरीची वाळू घेऊन वाहतूक करणारी आणखी २ वाहने पकडल्याने वाळू तस्करी करणारी जप्त वाहनांची संख्या आता तब्बल ३२ वर जाऊन पोहोचली आहे.माहूर तहसीलदार किशोर यादव व ना.त.देठे आणि ना.त.डॉ.राठोड या माहूर तहसीलच्या त्रिमूर्तीकडून चोरीची वाळू व वाहतूक करणारे वाहनांच्या धरपकडीचा जबरदस्त धसका घेऊन आता वाळू तस्करांनी आपापली वाहने बिळात लपवून ठेवत स्वतः भुमिगत होण्याच्या मार्गावर असल्याच्या चर्चा ऐकायला मिळत आहेत.

जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी वाळू तस्करी करणाऱ्यांवर 'मोक्का' अंतर्गत कारवाई करण्याची परवानगी देत वाळू तस्करावर तडीपारची कार्यवाही करावी अशी मागणी पर्यावरणप्रेमी नागरीकांमधून होत असून सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली यांच्या आदेशानुसार तहसीलदार किशोर यादव यांनी तयार केलेल्या पथकात महाकाल उर्फ नायब तहसीलदार कैलास जेठे ,एस. के. साळसुंदर मंडळ अधिकारी, ओमप्रकाश तवर, ओंकार धनवे , प्रदीप कदम, सुमीत नैताम,अभिजीत कुडमते, साहेबराव गावंडे, तलाठी, ग्राम महसूल अधिकारी तसेच महसूल सेवक दिपक लोखंडे व सागर हिवाळे यांचेसह कोतवाल आणि कर्मचाऱ्यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे.

## राष्ट्रवादीच्या कंधार महिला शहराध्यक्षपदी आम्रपाली केकाटे

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि. ११ जानेवारी**

येथील सामाजिक कार्यक्रत्या सौ.आंम्रपाली राजकुमार केकाटे यांची आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी नियुक्ती पत्र देऊन राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला कंधार शहराध्यक्ष पदी निवड केली.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.ना.अजित दादा पवार,प्रदेशाध्यक्ष मा.खा.सुनिल तटकरे,राष्ट्रवादी महिला प्रदेशाध्यक्षा सौ.रुपालीताई चाकणकर,मा.आ.विक्रम काळे यांच्या आदेशानुसार लोहा-कंधार विधानसभेचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी नांदेड येथील बैठकीत सौ. आंम्रपाली केकाटे यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला कंधार शहराध्यक्ष पदी निवड केली. सौ.आंम्रपाली केकाटे ह्या घर संसार सांभाळत सतत सामाजिक तसेच राजकिय कामात सहभागी राहुन आग्रेसर होतात त्यांनी महिला संघटन करत कोरोणा काळात मोलाची भूमिका बजावली.

## पहिला पती असतांना दुसरा पती करणे पत्नीला पडले महागात

**• न्यायालयाच्या आदेशावरून पत्नीसह अकरा जणांविरूध्द गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा**
**अर्धापूर ,दि. ११ जानेवारी**

पहिल्या पतीसोबत संसार सुरू असतांना पती सोबत बेईमानी करून दुसऱ्या पुरूषाशी विवाह करणे पत्नीला चांगलेच महागात पडले आहे. या प्रकरणात पहिल्या पतीने दिलेल्या तक्रारीवरून पत्नीसह अकरा नातेवाईकांविरूध्द न्यायालयाच्या आदेशाने अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, प्रकरणात फिर्यादी मनोहर सुरेश तरटे यांचा विवाह सन २०१९ साली झाला होता. लग्नानंतर मनोहर यांना एक अपत्य झाले, तो मुलगा आज तीन वर्षाचा आहे. या दोघांचा संसार सुरू असतांना त्यांची पत्नी यांनी तीन वर्षाचा मुलाल घेऊन मनोहरच्या घरातून पलायन केले. तिकडे मनोहर तरटे यांनी आपली पत्नी आणि मुलाचा सर्वत्र शोध घेतला. परंतू ते त्यांना कुठेही आढळून आले नाही. दरम्यान तरटे यांची पत्नीने अंकुश सांडू शिंदे रा. हट्टी ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांच्याशी दुसरा विवाह केला. याबाबत अनेक वेळा अर्धापूर पोलीस ठाण्यात तक्रार देवूनही आरोपी विरूध्द कसल्याही प्रकारची कारवाई झाली नाही. शेवटी तक्रारकर्ते मनोहर सुरेश तरटे यांनी न्यायालयाची दारे ठोठावली.



या प्रकरणी फिर्यादी मनोहर तरटे यांच्याकडुन ॲड. शेख आमेर शेख सगीर यांनी अर्धापुर न्यायालयात भक्कम पुरावे देत बाजु मांडल्यामुळे आरोपी पत्नी हिने पहिल्या पतीसोबत बेईमानी करून दुसऱ्या व्यक्तीसोबत दुसरा विवाह केल्यामुळे फिर्यादीची पत्नी व तिच्या नातेवाईकांवर गुन्हा दाखल करण्याची न्यायालयासमोर विनंती केली. यात फिर्यादीचे वकील ॲड. शेख आमेर शेख सगीर यांनी केलेल्या भक्कम युक्तीवादानंतर अर्धापूर न्यायालयाचे प्रथम वर्ग न्यायाधीश क्यु. आर. सय्यद यांनी आरोपी पत्नीसह इतर ११ नातेवाईकांविरूध्द गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते.

अर्धापूर न्यायालयाच्या या आदेशानुसार फिर्यादी मनोहर सुरेश तरटे यांच्या तक्रारीवरून आरोपी पत्नी, दुसरा पती अंकुश सांडू शिंदे. रा. हट्टी ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर, भिमराव जालिंदर भोसले, देवशाला भिमराव भोंसले, दिपाली अभिमान भोसले, अभिमान पि. मचिंदर भोसले, जालिंदर सदाशिव भोसले, देवकाबाई जालिंदर भोसले, रा. कोताळा ता. मानवत जि. परभणी, सुरेश सांडू शिंदे, कांताबाई सांडू शिंदे, आजोबा सांडू बारकू शिंदे रा. हट्टी ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर या एकूण ११ इतर नातेवाईकांविरूध्द फिर्यादी मनोहर सुरेश तरटे यांच्या तक्रारीवरून अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून या प्रकरणी पुढील तपास जमादार बोदमवाड हे करित आहेत.

# मुलींचे शिक्षण, आरोग्य आणि त्यांच्या हक्कांना प्राधान्य देणे सर्वांची जबाबदारी

## जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या बैठकीत अधिकाऱ्यांना सूचना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ जानेवारी**

स्त्री-पुरुषात समानता आणण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करायला हवेत. मुलगी शिकली, प्रगती झाली हे केवळ नारा न राहता तो आपल्या आचरणात उतरवण्याची वेळ आली आहे. मुलींच्या शिक्षण, आरोग्य आणि त्यांच्या हक्कांना प्राधान्य देणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, अशा सूचना जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी आयोजित बैठकीत सर्व संबंधिताना दिल्या.

जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या अध्यक्षतेखाली येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात नुकतीच जिल्हास्तरीय कृती दलाची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.नितीन तडस, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. गोपाल कदम, डॉ. मंगेश टेहरे, डॉ. मनीष बगडीया, विधी समुपदेशक ॲड सुकेशिनी ढवळे उपस्थित होते.

या बैठकीत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस यांनी पीसीपीएनडीटी कार्यक्रमाअंतर्गत हिंगोली जिल्ह्यातील, तालुक्यातील लिंग गुणोत्तर प्रमाण याची माहिती दिली. तसेच एखाद्या ठिकाणी लिंग निदान करण्याचे काम सुरू असल्याची माहिती मिळाल्यास ती शासनास १०४ व १८००२३३४४७५ या टोल फ्री क्रमांकावर तसेच संकेतस्थळावर ऑनलाईन तक्रार करता येते. माहिती कळविणाऱ्यास शासनाकडून खबरी बक्षीस म्हणून एक लाख रुपये देण्यात येते. याबाबत माहिती देणाऱ्याचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवले जात असल्याची माहिती दिली.



**हिंगोली- शहरातील खुराणा पेट्रोल पंपासमोरील अतिक्रमण धारकांवर आज पोलिस व पालिका प्रशासनाने कार्यवाही केली. या अतिक्रमणाच्या पाठीमागे असलेल्या मोकळ्या जागेत अशाप्रकारे कचरा, नारळे, सडकी फळे आदीं टाकून घाण करण्यात आल्याचे चित्र दिसत आहे. छाया- सुनील पाठक**

# राहोली बुद्रुक खून प्रकरणात सात जणांना जन्मठेपेची शिक्षा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ जानेवारी**

तालुक्यातील राहोली बु. येथे शेतीच्या वादातून एकाचा खून केल्याच्या आरोपावरून सात जणांना जन्मठेप व सात लाख रूपये दंडाच्या शिक्षेचा निर्णय जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायधीश एस एन माने-गाडेकर यांनी शुक्रवार दि १० जानेवारी रोजी दिला आहे.

याबाबत सहायक सरकारी वकील ॲड एस डी कुटे यांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली तालुक्यातील राहोली बु. येथील शंकर लक्ष्मण डोरले वय ३० यांचा गावातील रमेश किशनराव डोरले याच्यासोबत शेतीचा वाद होता. यातून त्यांच्यात नेहमीच कुरबूरी होत होत्या. त्यानंतर दि २१ मे २००९ रोजी दुपारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास वाद वाढल्यानंतर सात जणांनी शंकर यांना कुऱ्हाडीने व लाथाबुक्यांनी मारहाण करून त्यांचा खून केला.

याप्रकरणी लक्ष्मण डोरले यांचय तक्रारीवरून हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात रमेश डोरले, विठ्ठल घोंगडे, आंबादास डोरले, रामकिसन डोरले, नामदेव घोंगडे, ज्ञानेश्वर बोरगड, मारोती डोरले सर्व रा राहोली बु. यांच्या विरूध्द हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. तत्कालीन पोलिस निरीक्षक अंगद सुडके, जमादार अशोक धामणे यांच्या पथकाने अधिक तपास करून न्यायालयात दोषारोप पत्र सादर केले होते.

सदर प्रकरण जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायधीश एस एन माने-गाडेकर यांच्या न्यायालयात सुनावणीसाठी आले. या प्रकरणात एकूण १२ साक्षीदार तपासण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने सातही जणांना जन्मठेप व ७ लाख रूपये दंडाची शिक्षा सुनावली. दंडाच्या रकमेपैकी ३ लाख रूपये मयत शंकर यांच्या पत्नीला देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. या प्रकरणात सरकारी पक्षातर्फे ॲड एस डी कुटे यांनी काम पाहीले. त्यांना ॲड एन एस मुटकुळे, ॲड एस एस देशमुख, जमादार नंदकिशोर जाधव, पी बी धुर्वे यांनी सहकार्य केले.

# कळमनुरी, औंढा तालुक्यात अवैध गौण खनिज करणाऱ्या विरोधात महसूल, पोलिसांची कार्यवाही

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ जानेवारी**

कळमनुरी तालुक्यात अवैधरित्या गौण खनिज भरलेले पाच टिप्पर व एक ट्रॅक्टर पकडून महसूल प्रशासनाने चांगलाच दणका दिला आहे. तर औंढा नागनाथ तालुक्यातील अनखळी पोटा शिवारातील पूर्णा नदीच्या पात्रातून वाळू वाहतूक करणाऱ्या दोन ट्रॅक्टरसह एक यंत्र पोलिस अधीक्षकांच्या विशेष पथकाने जप्त केले आहे. जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या आदेशानंतर जिल्हाभरात अवैध गौण खनिल करणाऱ्याविरोधात महसुल व पोलिस प्रशासनाने जोरदार मोहीम उघडली असून या कार्यवाहीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

जिल्हाभरात अवैधरित्या गौण खनिज उपसा करून त्याची वाहतूक केली जात असल्याच्या तक्रारी पोलिस विभागासह महसूल प्रशासनाकडे दिल्या जात होत्या. त्यावरून जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी महसूल प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन अवैधरित्या होणारी गौण खनिज वाहतूक रोखण्यासाठी तातडीने पथके स्थापन करून कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. तर दुसरीकडे पोलिस विभागानेही कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. कळमनुरी तालुक्यात उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भूते, तहसीलदार जीवककुमार कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली तलाठी अशोक केंद्रेकर, गंगाराम बेले, गणेश धाडवे, नागेश कांबळे, महेश गळाकाटू, अमोल गंगावणे, पंजाब होडबे, कैलास मोगले, मन्सूर शेख, दगडूजी बाट व महसूल सेवक पांडुरंग माने, भिवाशंकर क्षीरसागर यांच्या पथकाने पहाटे अडीच वाजता डिग्रस बुद्रुक ते रामेश्वर तांडा शिवारात पाहणी केली असता तेथे एका ठिकाणी मुरूम भरलेले पाच टिप्पर दिसून आले. या पथकाने पाचही टिप्पर ताब्यात घेऊन आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात आणले. त्यानंतर पथकाने माळेगाव ते पुसद मार्गावर तपासणी करून वाळू वाहतूक करणारे एक ट्रॅक्टर जप्त करून कळमनुरी पोलिस ठाण्यात आणले. एकाच रात्रीत महसूल विभागाने सहा वाहने जप्त केली आहेत. या प्रकरणात संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

औंढा नागनाथ तालुक्यातील अनखळी पोटा शिवारातील पूर्णा नदीच्या पात्रातून वाळू उपसा केल्या जात आहे. विशेष म्हणजे वाळू तस्कर रात्रीच्यावेळी यंत्राच्या सहाय्याने वाळू उपसा करून साठा करून ठेवत असून त्यानंतर त्याची वाहतूक केली जात असल्याची माहीती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या विशेष पथकातील उपनिरीक्षक युवराज गवळी, जमादार भूजंग कोकरे, भिल्ला वाघ, विजय पडवळ, मुरलीधर ठाकरे, संदीप टाक यांच्या पथकाने पूर्णा नदीच्या पात्रात पाहणी केली. यावेळी एका यंत्राच्या सहाय्याने नदी पात्रातून वाळू काढली जात होती तर वाळू वाहतुक करणारे दोन ट्रॅक्टर तेथे उभे करून ठेवलेले दिसले. पथकाने दोन्ही ट्रॅक्टर व वाळू उपसा करणरे यंत्र सुमारे दोन ब्रास वाळू असा ११लाख ६७ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी जमादार भूजंग कोकरे यांच्या तक्रारीवरून औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात नवनाथ डोंबे, नवनाथ गारकर यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



**हिंगोली- येथील शासकीय विश्रामगृहात शनिवारी उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाची आढावा बैठक पार पडली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांबाबब चर्चा करण्यात आली. यावेळी संपर्क प्रमुख बबनराव थोरात, जिल्हाप्रमुख गोपू पाटील, माजी आ. डॉ संतोष टारफे, सहसंपर्क प्रमुख विनायक भिसे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. छाया- विजय गुंडेकर**


## संक्षिप्त वृत्त

### सराफा संघटनेकडून पोलिस अधीक्षकांचा सत्कार



हिंगोली- जिल्हा पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे व सहायक पोलिस अधिक्षक अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबी मार्फत अवध्या ९ दिवसात १०० टक्के चोरीचा मुद्देमाल जप्त करून दिल्याबद्दल सराफा संघटनेकडून सत्कार करण्यात आला. या प्रसंगी जिल्हा अध्यक्ष सुरेश आप्पा सराफ, माजी नगराध्यक्ष सुधीर आप्पा सराफ, सचिव किशोर सोनी, नागेश सराफ, दुर्गादास खर्जुले, राहुल सराफ, विजय टाक, संतोष सराफ, सचिन सराफ गोविंद बांगर, दत्ता भवरसह इतर व्यापारी उपस्थित होते.

### माधुरी शास्त्री यांचा सावरकर मंडळाकडून सत्कार



हिंगोली- डॉ.माधुरीताई शास्त्री हिंगोली यांना हरिद्वार येथे योगऋषी रामदेवबाबांच्या हस्ते योगरत्न पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यानिमित्त डॉ.सौ.माधुरीताई शास्त्री व प्रा.शास्त्री स्वा. सावरकर मित्र मंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला व शुभेच्छा देण्यात आल्या सत्कार प्रसंगी प्रा.डी.एम. कुलकर्णी, प्रा.डी.जी.कुलकर्णी, सौ.कुलकर्णी, स्वा.सावरकर मित्र मंडळाचे महेश पेंडके, डॉ.प्रा.गोविंद भालेराव, गणेश पहिनकर आदींची उपस्थिती होती.

### तिसऱ्या दिवशीही अतिक्रमधारकांवर कारवाई

हिंगोली- शहरातील खुराणा पेट्रोल पंपासमोर आणि परिसरात अतिक्रमणांमुळे वारंवार वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता. रस्त्याच्या बाजूला असलेल्या पादचारी मार्गावर येथील खुराणा पेट्रोल पंपासमोर काही फळविक्रेत्यांनी अनेक वर्षापासून अतिक्रमण केले होते. अखेर शहरपोलिस, वाहतुक पोलिस व पालिकेच्यावतीने या ठिकाणी असलेले अनेक वर्षापासूनचे अतिक्रमण काढल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# धानोरा जहाँगीर येथील पाणीपुरवठा योजनेची पाईपलाईन दुरूस्त करा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ जानेवारी**

धानोरा (जहाँगीर) येथील पाणीपुरवठा योजनेची तोडलेली पाईप लाईन दुरूस्ती करण्याची मागणी येथील सरपंच सविता शिंदे यांच्यासह गावातील पदाधिकाऱ्यांनी निवेदनाद्वारे तहसीलदार कांबळे यांचेकडे केली आहे.

धानोरा (जहाँगीर) ता.कळमनुरी येथील ग्रामपंचायतीच्या वतीने ईसापूर धरणांच्या विहिरीतून जनतेला पाणीपुरवठा करण्यात येतो परंतु अर्धापूर शहरासाठी पाणी पुरवठा करण्यासाठी इसापूर धरणावरून मेगा इंजिनिअरिंग इन्फ्रास्टकचर कंपनी हैद्राबाद पाईप लाईनचे काम चालू आहे.कंपनी व्यवस्थापक श्री.श्रवण आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांनी मागील शुक्रवारी दि.३ जानेवारी २०२५ रोजी धानोरा ( जहाँगीर) गावाला पाणीपुरवठा करणारी पाईप लाईन जेसीबी मशीन तोडल्यामुळे ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात येणार पाणीपुरवठा बंद झाला आहे.

तहसीलदार कळमनुरी यांनी मेगा इंजिनिअरिंग इन्फ्रास्टकचर कंपनी हैद्राबाद यांचे व्यवस्थापक श्रवण यांना आदेश देऊन धानोरा (जहाँगिर) ग्राम पंचायतीच्या वतीने ईसापूर धरणांच्या विहिरीतून जनतेला पाणीपुरवठा करण्यात येणारी तोडलेली पाईप लाईन दुरूस्ती करून देण्यात यावी या मागणीचे निवेदन तहसीलदार जिवक कांबळे यांना धानोरा (जहाँगिर) गावाच्या सरपंच सौ.सविता रवि शिंदे, ॲड. रवि शिंदे, उपसरपंच लक्ष्मण पोटे, चेअरमन बंडू कोरडे, तंटामुक्ती अध्यक्ष प्रफुल्ल पाईकराव, ग्रा.प.सदस्य मोतीराम मोरे यांनी दिले.

# नागेश्वर शाळेत विज्ञान प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ जानेवारी**



औंढा नागनाथ शहरातील नागेश्वर प्राथमिक व माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष राम नागरे यांच्या हस्ते झाले.

या विज्ञान प्रदर्शनामध्ये ऑक्सिजन जलनास मदत करतो, खनिज तेलापेक्षा पाणी जड, पाण्याची घनता, चंद्रयान ३, ज्वालामुखी,पवन ऊर्जा, ई सेवा केंद्र,लेझर सिक्युरिटी हाऊस, मायक्रोस्कोप, पेरिस्को, डी एन ए स्ट्रक्चर, न्यूक्लिअर रिॲक्टर, पैडुलम साईड,पाणी प्रदूषण,मिसाईल लॉन्चर या प्रयोगासह विद्यार्थ्यांनी ९० प्रयोग विज्ञान प्रदर्शनामध्ये सादर केली होती. या प्रयोगामध्ये ३६० विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. संस्थेचे अध्यक्ष राम नागरे, सीता नागरे, उद्धव नागरे, प्राचार्य ज्ञानोबा लांडे, मुख्याध्यापक जयकुमार इंगोले, उपमुख्याध्यापक शेख सईद, उपप्राचार्य विद्याधर जगताप, विकास साळवे, हनुमान कदम, प्रवीण देशमुख, राम वाघमारे, रवी राठोड, कृष्णा मांडे, नवनाथ भोंग, परसराम मोरे, गजानन गुव्हाडे, सिताराम इंगळे, नवनाथ घुगे शिवकुमार देशमुख, अंबादास वाहेळ, कपिल वानखेडे, वामन अंभोरे, दत्ता घुगे, रुखमाजी नवले, गजानन तावरे, गजानन कराळे, नामदेव मुंडे दत्ता भुमरे, सावळे, हनुमान कदम, एकनाथ जाधव राहुल दवणे, पांडुरंग गीते, रुकमाजी जाधव, मंगल खरात, वर्षा व्हडगीर, प्रज्ञा वाघमारे, पूजा आव्हाड उज्वला मनोरे, उर्मिला नागरे यांच्यासह पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# कै. विठ्ठलराव घुगे शाळेत वार्षिक स्नेहसंमेलनात विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ जानेवारी**



येथील गंगानगर भागातील कै विठ्ठलराव घुगे प्राथमिक माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन दि. १० जानेवारी २०२५ रोजी विशाल कयाल मंगल कार्यालय राणी सती मंदिर गंगानगर येथे पार पडले. यावेळी विद्यार्थ्यांनी बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर करीत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

यावेळी शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी आपले विविध कला प्रकार सादर केले त्यामुळे हे वार्षिक स्नेहसंमेलन रंगले. शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध कला प्रकार सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार गजाननराव घुगे तसेच प्रमुख पाहुणे आमदार तानाजीराव मुटकुळे, रत्नाकर महाजन, हमीदभाई प्यारेवाले,संस्थेचे सचिव शिवशंकर घुगे, सौ सहसचिव नंदाताई घुगे, सौ अंकिताताई घुगे, मुख्याध्यापक अर्धापूरकर ए सी आदींची उपस्थिती होती.

मान्यवरांच्या हस्ते विद्येची आराध्य दैवता माता सरस्वती व कै विठ्ठलराव घुगे व कै लक्ष्मीबाई घुगे यांच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. विद्यालयाचा आठवी वर्गातील विद्यार्थी प्रतीक बर्वे याची इंडिया बुक ऑफ द रेकॉर्डमध्ये नोंद झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला व तसेच विद्यालयाचे सहशिक्षक जि.एस. हलगे यांना भारत सरकारकडे नोंदणीकृत संस्था ज्ञानरचना सोशल फाउंडेशन कल्याण ठाणे महाराष्ट्र राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ साठी निवड झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक अर्धापूरकर ए.सी यांनी केले. मनोगतामध्ये आमदार तानाजीराव मुटकुळे यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास कसा करावा शिक्षणात येणाऱ्या अडचणी याबाबत मार्गदर्शन केले. तसेच अध्यक्षीय भाषणात संस्थेचे अध्यक्ष गजाननराव घुगे यांनी विद्यार्थ्यांना बौद्धिक विकासाबरोबरच शारीरिक विकास होण्यासाठी विविध क्रीडा स्पर्धा मध्ये सहभाग आणि छंद जोपासण्यासंबंधी मार्गदर्शन केले. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या मनोगतनंतर प्रत्यक्ष कार्यक्रमाला सुरुवात झाली यामध्ये विद्यार्थ्यांनी स्वागत गीत, भक्ती गीत देशभक्तीपर गीत, लावणी, फनी साँग, साउथ इंडियन साँग, नाटिका सादर केल्या. विद्यार्थ्यांनी विविध गाणी सादर करून प्रेक्षकांची मनी जिंकली. वार्षिक स्नेहसंमेलनाच्या समारोपाच्या कार्यक्रमात संस्थेचे सचिव शिवशंकर घुगे यांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती पतंगे, श्रीमती कटेकर व हलगे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन घुगे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी पार पाडण्यासाठी मुख्याध्यापक अर्धापूरकर ए.सी., श्रीमती पतंगे के आर, श्रीमती चंद्रवंशी आर.ए. घुगे एस बि, श्रीमती धुमाळे एस बि, पतंगे जि पि, दराडे एस एम, सोनवणे एन आर, इघारे वाय बी, नागरे जि एल, श्रीमती कोट्टी एस व्हि, इंगळे एस एल, श्रीमती कट्टेकर एस आर, उबाळे एस एस, हलगे जि एस, श्रीमती चेंडके एम पी, श्रीमती जाधव, मुळे ए .ए, कुलकर्णी, गणेश जाधव, गायकवाड, शेवाळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.